सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ८६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २४ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ‘दहशतवाद्यांनी कल्पनाही केली नसेल त्यापेक्षा कठोर शिक्षा देणार’ ; बिहारमधून पंतप्रधान मोदींचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मधुबनी बिहार**

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या भीषण हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारच्या मधुबनी दौऱ्यावर आहेत. बिहारच्या येथे विविध कामांच्या उद्धघाटनाच्या कार्यक्रमासाठी पंतप्रधान मोदी आले होते. यावेळी या सभेमध्ये आपल्या भाषणाच्या सुरुवातीला, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही वेळ मौन बाळगून पहलगाममध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहिली. देशाच्या आत्म्याला दुखावणाऱ्या दहशतवाद्यांना कोणत्याही किंमतीत सोडले जाणार नाही, असे पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणात स्पष्ट केले आहे.



जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमध्ये सार्वजनिक व्यासपीठावर दिसले. या व्यासपीठावरून पंतप्रधान मोदींनी दहशतवाद्यांना कडक इशारा दिला. पंतप्रधानांनी यावेळी दहशतवाद्यांचा खात्मा करण्याबद्दल भाष्य केले. त्यामुळे आता हे स्पष्ट झालंय की पहलगाममधील दहशतवाद्यांच्या कारवायीनंतर सरकार आता त्यांना योग्य उत्तर देण्याच्या तयारीत आहे.

पहलगाम हल्ल्याच्या घटनेमुळे संपूर्ण देश दुःखी आहे. सर्व पीडित कुटुंबियांच्या दुःखात सगळा देश त्यांच्यासोबत उभा आहे. ज्यांच्यावर उपचार चालू आहेत ते लवकर बरे व्हावेत यासाठीही सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. या दहशतवादी हल्ल्यात कुणी आपला मुलगा, भाऊ आणि जोडीदार गमावला. त्यातील प्रत्येक जण वेगवेगळे भाषिक होते. या सर्वांच्या मृत्यूवर आपल्या सर्वांचे दुःख, आक्रोश एकसारखा आहे. हा हल्ला फक्त पर्यटकांवरच झाला नाही तर देशाच्या शत्रूंनी भारताच्या आत्म्यावर हल्ला करण्याचे धाडस केले आहे. मी स्पष्ट शब्दात सांगतोय की, ज्यांनी हा हल्ला केला आहे त्या दहशतवाद्यांना आणि हा कट रचणाऱ्यांना त्यांनी कल्पनाही केली नसेल त्यापेक्षा जास्त कठोर शिक्षा दिली जाईल. शिक्षा मिळणारच. आता उरलेल्या दहशतवाद्यांनाही मातीत गाडण्याची वेळ आली असून त्यांचे उरलेले अड्डे नष्ट करण्याची वेळ आली आहे. १४० कोटी भारतीयांची इच्छाशक्ती दहशतवाद्यांच्या प्रमुखांचे कंबरडे मोडून ठेवणार आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

आज बिहारच्या मातीतून मी संपूर्ण जगाला सांगतोय की, भारत प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांना शोधून काढेल आणि कठोर शिक्षा देईल. आम्ही शेवटापर्यंत त्यांचा पाठलाग करू. दहशतवादामुळे भारताचा आत्मा कधीही तुटणार नाही. दहशतवाद्यांना शिक्षा झाल्याशिवाय राहणार नाही. न्याय मिळावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. मानवतेवर विश्वास ठेवणारा प्रत्येकजण आपल्यासोबत आहे. आमच्यासोबत उभे राहिलेल्या विविध देशांच्या लोकांचे आणि त्यांच्या नेत्यांचे मी आभार मानतो, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

## पहलगाम हल्ल्यानंतर भारताने केला सिंधू करार स्थगित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नवी दिल्ली**

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारने सिंधू नदी पाणी करार थांबवला. बुधवारी भारताच्या सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीच्या (सीसीएस) बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानंतर पाकिस्तान घाबरलाय. कारण, भारत इतका मोठा निर्णय घेऊ शकेल अशी पाकिस्तानला कदाचित अपेक्षा नव्हती. यापूर्वी २०१९ च्या पुलवामा आणि २०१६ च्या उरी हल्ल्यानंतरही भारताने पाकिस्तानसोबतचा हा करार थांबवला नव्हता. मात्र, पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू करार स्थगित केलाय. याचा पाकिस्तानवर मोठा परिणाम होणार आहे.




सिंधू पाणी करार १९६० मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झाला, ज्याअंतर्गत सिंधू, झेलम आणि चिनाब नद्यांचे पाणी प्रामुख्याने पाकिस्तानला, तर रावी, बियास आणि सतलज नद्यांचे पाणी भारताला मिळाले. हा करार जागतिक बँकेच्या मध्यस्थीने करण्यात आला होता. तत्कालीन भारतीय पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांच्यात झालेल्या कराराच्या अटींनुसार, भारत किंवा पाकिस्तान दोघेही एकतर्फीपणे हा करार रद्द करू शकत नव्हते किंवा त्यातून माघार घेऊ शकत नाहीत.दरम्यान, आता भारताने हा करार स्थगित केल्यामुळे, पाकिस्तानला पाण्याच्या गंभीर संकटाचा सामना करावा लागू शकतो, कारण त्यांची ८०% शेती आणि मोठ्या प्रमाणात पिण्याचे पाणी या नद्यांवर अवलंबून आहे.इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, कराराच्या अटीत म्हटलंय की, कोणताही पक्ष एकतर्फीपणे पाण्याचा प्रवाह पूर्णपणे थांबवू शकत नाही. मात्र, भारत कलम ३ च्या तरतुदींनुसार पाण्याचा प्रवाह कमी करू शकतो. भारताच्या या निर्णयाकडे भारतीय भूमीवर वारंवार होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांविरुद्ध आवश्यक कारवाई म्हणून पाहिलं जातंय.

## भारताच्या कारवाईने पाकिस्तानची ‘हवा टाईट’ मिसाइल चाचणीची केली घोषणा, सर्वत्र ‘हाय अलर्ट’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४कराची**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये मंगळवारी काही दहशतवाद्यांनी हल्ला करून २६ भारतीय निष्पाप हिंदू नागरिकांची हत्या केली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताकडून कठोर पावले उचलण्यात आली. सिंधू पाणी करार रद्द करण्यात आला. तसेच ४८ तासांत पाकिस्तानी नागरिकांना भारतातून बाहेर होण्यास सांगण्यात आले. याशिवाय, भारतातील पाकिस्तानचे उच्च आयुक्तालयही बंद करण्यात आले. भारताने कडक कारवाई केल्यानंतर पाकिस्तान बिथरला असून त्यांनी दुसऱ्याच दिवशी क्षेपणास्त्र चाचणी करण्याची घोषणा केली आहे. पाकिस्तानने २४ किंवा २५ एप्रिल रोजी त्यांच्या विशेष आर्थिक क्षेत्रात कराची किनाऱ्याजवळ जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची चाचणी घेण्याची अधिसूचना जारी केली आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने कठोर कारवाई केल्यामुळे पाकिस्तानमध्ये घबराटीचे वातावरण आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने




कठोर कारवाई केली असल्याने पाकिस्तानचे धाबे दणाणले आहे. अशा वेळी बिथरलेल्या पाकिस्तानने लगेच दुसऱ्याच दिवशी मिसाईल टेस्टची घोषणा केली आहे. पाकिस्तानच्या कुरापती अद्यापही कमी होत नसल्याने पाकिस्तानच्या या घोषणेनंतर भारतीय एजन्सी या चाचणीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. तसेच भारतीय सुरक्षा यंत्रणादेखील इतर सर्व घडामोडींवर बारीक नजर ठेवून आहेत.

**क्षेपणास्त्र चाचणी कधी होणार?**

वृत्तसंस्था एएनआयने संरक्षण सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की, पाकिस्तानने २४, २५ एप्रिल रोजी कराची किनाऱ्याजवळ त्यांच्या विशेष आर्थिक क्षेत्रातून चाचणी घेण्याची माहिती दिली आहे. जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे असे हे मिसाइल आहे. हे क्षेपणास्त्र चाचणी करण्याची अधिसूचना पाकिस्तानने जारी केली आहे. त्यामुळे संबंधित भारतीय संस्था या सर्व घडामोडींवर लक्ष ठेवून आहेत.

**'बीटिंग द रिट्रीट' सेरेमनी रद्द**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यामुळे पुन्हा भारत आणि पाकिस्तानमधील संबंध ताणले गेले आहेत. हल्ला झाल्यानंतर भारतात राहत असलेल्या पाकिस्तानी नागरिकांनी बॅगा पॅक करून पाकिस्तानात जाण्यासाठी डजउ वर गर्दी केली आहे. भारतीयांना बदला हवाय असा सूर देशभरातून उमटू लागला आहे. यादरम्यान, बीएसएफ केंद्राच्या एका आदेशाची वाट पाहत आहे. सूर्यास्तापूर्वी आदेश आला तर दररोज होणारा बीटिंग द रिट्रीट सेरेमनी बंद करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## पाकिस्तानचा गळा कापण्याची वेळ, इस्त्रायलसारखा बदला घ्यावा; अमेरिकेतून दिला गेला सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४वाशिंग्टन**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आता भारतातच नाही तर जगातही संताप व्यक्त होत आहे. धर्म विचारून, खतना केलाय का हे कपडे उतरवून पाहिले गेले आणि पर्यटकांना गोळ्या झाडण्यात आल्या. यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दहशतवाद्यांनी विचारही केला नसेल अशी कारवाई केली जाणार असल्याची घोषणा केली आहे. या काळात अमेरिकेच्या पेंटागॉनच्या माजी अधिकाऱ्याने इस्त्रायलसारखा बदला घ्यावा, आता कोणताही




मार्ग उरलेला नाही, असे म्हटले आहे.


पेंटागॉनचे माजी अधिकारी मायकल रुबिन यांनी या हल्ल्याला पाकिस्तानी लष्कर प्रमुखांच्या काही दिवसांपूर्वीच्या भाषणाला जबाबदार धरले आहे. असीम मुनीर यांनी काही दिवसांपूर्वी भारताविरोधात गरळ ओकली होती. काश्मीर आणची गळ्याची नस होती. ती नसच राहणार आहे. आम्ही हे विसरणार नाही. आमच्या काश्मीरी भावांना त्यांच्या संघर्षकाळात सोडणार नाही, असे मुनीर यांनी म्हटले होते. यावर रुबिन यांनी म्हटले की, आता या हल्ल्यानंतर स्पष्ट आहे, भारताला पाकिस्तानचा गळा कापण्याची गरज आहे. यामध्ये कोणताही किंतू-परंतू असता नये.

पाकिस्तान हे लष्कर-ए-तैयबासह अनेक दहशतवादी संघटनांचे माहेरघर आहे, हे आम्हाला माहिती आहे. दुर्दैवाने पाकिस्तानी राजदूतांनी पाश्चिमात्य देशांना मूर्ख बनविले, यामुळे दहशतवादविरोधी कारवाईचा अभाव होता. बांगलादेशमध्येही आता ही समस्या पसरत आहे. तार्किक आणि वैचारिकदृष्ट्या पाहिले तर पाकिस्तानची आयएसआय यामागे आहे, तसेच एकमेव देश ज्यावर सध्या या हल्ल्याचा दाट संशय आहे, असे रुबिन यांनी मत मांडले. कालचा दहशतवादी हल्ला हा ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्यासारखेच आहे. तो हल्ला विशेषतः ज्यूंवर होता. आता मध्यमवर्गीय हिंदूंना लक्ष्य करून, पाकिस्तानीही तीच रणनीती अवलंबत आहे. अशा परिस्थितीत इस्त्रायलने हमाससोबत जे केले तेच पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या आयएसआयसोबत करणे गरजेचे आहे. आयएसआयच्या नेतृत्वाला संपवून त्यांना दहशतवादी गट म्हणून घोषित करण्याची आणि भारताचा मित्र असलेल्या प्रत्येक देशाने असे करण्याची अशी मागणी करण्याची वेळ आल्याचे ते म्हणाले.

## पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यास सुरूवात; हाती फक्त तीन दिवस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नवी दिल्ली**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानविरुद्ध मोठी कारवाई करण्यास सुरूवात केली असून, याचाच एक भाग म्हणून आता पाकिस्तानी नागरिकांचा व्हिसा रद्द करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. तसेच पाकिस्तानी नागरिकांना पुढील ३ दिवसांत




भारत सोडण्याचे आदेश देत या नागरिकांचे व्हिजा केवळ २७ एप्रिलपर्यंत वैध असतील. याशिवाय पाकिस्तानी नागरिकांचा वैद्यकीय व्हिसा २९ एप्रिलपर्यंत वैध असेल असे भारत सरकारने स्पष्ट केले आहे.केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्यासाठी ४८ तासांची मुदत दिल्यानंतर, गुरुवारी या शेजारील देशातील अनेक नागरिक अटारी-वाघा सीमा मार्गाने घरी परतण्यास सुरुवात केली. मंगळवारी काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या प्राणघातक दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आणि सीमापार संबंध ताणल्यानंतर केंद्राने बुधवारी पाकिस्तानी लष्करी सल्लागार (अटॅच) यांची हकालपट्टी, १९६० चा सिंधू पाणी करार निलंबित करणे आणि अटारी जमीन वाहतूक चौकी तात्काळ बंद करणे यासह अनेक उपाययोजना जाहीर केल्या. या हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला.

## पहलगाम इथं पर्यटकांवर हल्ला करणारे दहशतवादी भारतात कसे घुसले?; समोर आला मार्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४पहलगाम**

काश्मीर खोऱ्यातील मिनी स्विझरलँड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पहलगाम इथं दहशतवाद्यांना २६ पर्यटकांना गोळ्या घालून मारले आहे. या हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली असून सरकारने सैन्याला अलर्ट राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. सौदीवरून परतलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी या घटनेबाबत विविध अधिकाऱ्यांच्या बैठका घेत आहेत. त्यातच सुरुवातीच्या तपासात गुप्तचर यंत्रणांनी



पहलगामचे दहशतवादी भारतात कुठून घुसले याचा शोध घेतला आहे. पीर पंजालच्या डोंगराळ भागातून हे दहशतवादी भारतात आले. त्यानंतर राजौरीवरून चत्रु, मग वधावनमार्गे ते पहलगामपर्यंत पोहचले असं तपासात समोर आले.

हा संपूर्ण परिसरात रियासी आणि उधमपूर जिल्ह्यात येतो जिथं गुज्जर आणि बकरवाल समुदायाची मोठी लोकसंख्या आहे. हा मार्ग दहशतवाद्यांनी याचसाठी निवडला असावा जेणेकरून सामान्य लोकांच्या आड लपून ते प्रवास करू शकतील असा अंदाज आहे. पहलगाम हल्ल्यानंतर उत्तर प्रदेश पोलीस, सशस्त्र सुरक्षा दलासह विविध संस्थांनी भारत-नेपाळच्या सोनौली सीमेवर सुरक्षा वाढवली आहे. या भागातून दहशतवाद्यांचा मार्ग रोखण्यासाठी सीमा ओलांडण्याप्रूवी प्रत्येकाची कसून चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## लवकरात लवकर पाकिस्तान सोडा, केंद्र सरकारचे भारतीय नागरिकांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नवी दिल्ली**

पाकिस्तानमधील भारतीय नागरिकांनी लवकरात लवकर पाकिस्तान सोडण्याचे आदेश भारत सरकारने नागरिकांना दिले आहे. जम्मु आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ पर्यटकांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली आहे. तर दुसरीकडे या हल्ल्यानंतर केंद्र सरकारने देखील कारवाईला सुरुवात केली आहे.




या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आता सरकारने पाकिस्तानविरोधात कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

बुधवारी रात्री पीएम मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सरकारने परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर निर्णय जाहीर केले, ज्यात सिंधू पाणी करार निलंबित करणे, वाघा-अटारी सीमा बंद करणे, पाकिस्तानी नागरिकांसाठी सार्क अंतर्गत व्हिसा सूट रद्द करणे यांचा समावेश आहे. केंद्र सरकारने व्हिसा सूट रद्द केल्याने आता भारतात असणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना २९ एप्रिलपूर्वी भारत सोडण्याचे आदेश केंद्र सरकारकडून देण्यात आले आहे.तर दुसरीकडे सध्या पाकिस्तानमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांनाही लवकरात लवकर भारतात परतण्याचा सल्ला परराष्ट्र मंत्रालयाकडून देण्यात आला आहे.

## संपादकीय ......

# पाकची नांगी ठेचा

पृथ्वीवरील स्वर्ग, अशी ओळख असलेल्या जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या सहा वर्षांतील सर्वात नृशंस हल्ला करून, पाकिस्तानने नीचपणाचा कळस गाठला. ३७० कलम हटवल्यानंतर जम्मू-काश्मिरात हळूहळू कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निवळू लागली होती. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांत मोठ्या प्रमाणावर मतदान झाले. ओमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील नवे सरकार स्थापित होऊन, लोकशाही प्रक्रिया सुरळीत होऊ लागली. यंदा प्रथमच देशी-विदेशी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. हे सर्व न पाहवणार्या पाकिस्तानने पहलगाम शहरापासून ६ किलोमीटर अंतरावरील बैसरन या गवताळ पठारावर सुनियोजित हल्ला करून, २७ पर्यटकांना ठार मारले. हे पर्यटक निसर्गाचा आनंद लुटत असताना, त्यांना टिपून टिपून मारण्यात आले.

गोळ्या घालण्यापूर्वी प्रत्येकाला त्याचा धर्म कोणता, हे विचारण्यात आले किंवा काहीजणांना कलमा किंवा कुराणातील ओळी म्हणण्यास सांगण्यात आले. कलमा म्हणता येत नाही, म्हणून गोळ्या घालण्यात आल्या आणि हिंदू धर्मीयांना थेट लक्ष्य करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अपशब्द उच्चारत, या दहशतवाद्यांनी वाह्यात शेरेबाजी केली. पाकिस्तानस्थित बंदी घातलेल्या लष्कर-ए-तोयबाचा हस्तक असलेल्या 'टीआरएफ' किंवा 'द रेसिडंटस् फ्रंट' संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी मात्र पहलगाम घटनेशी आमचा काहीच संबंध नाही, असे म्हणून कानावर हात ठेवले आहेत.२६-११ च्या मुंबईवरील हल्ल्याशी आमचा कोणताही संबंध नाही, असे पाकिस्तानने तेव्हाही म्हटले होते, पण खुद्द अजमल कसाबने आपण पाकिस्तानातूनच प्रशिक्षण घेऊन दहशतवादाच्या उद्देशाने आलो होतो, अशी कबुली दिली होती. त्याला फाशीही देण्यात आली, पण या हल्ल्याचे सर्व पुरावे पाकिस्तानला देऊनही, या कटाचा सूत्रधार आणि 'जमात-उद दावा' व 'तोयबा' या संघटनांचा संस्थापक असलेल्या हाफिज सईदवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. गेल्याच आठवड्यात पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी, पाकिस्तानी मुस्लिम हे प्रत्येक क्षेत्रात हिंदूंपेक्षा वेगळे आहेत. आमची संस्कृती व विचारसरणी निराळी असून, द्विराष्ट्र सिद्धांत हाच पाकिस्तानचा पाया आहे. काश्मीर ही आमची ठसठसणारी जखम आहे आणि काश्मीरवरील भारताच्या कब्जाविरुद्ध आम्ही लढणार आहोत, असे संतापजनक वक्तव्य केले होते. याचा अर्थ स्पष्ट आहे.

मुनीर हे उघड उघड प्रक्षोभक वक्तव्य करून दहशतवाद्यांना फूसच लावत आहेत. पहलगाममधील माताभगिनींचा सुरू असलेला आक्रोश पाहून कोणत्याही संवेदनशील माणसाचे काळीज हललेच असणार. या माणसांचा गुन्हा असा काय होता? शिवाय 'दहशतवादाला धर्म नसतो', अशी उपदेशवाणी नेहमी ऐकवली जाते, पण मग हे दहशतवादी लोकांना त्यांचा धर्म का विचारत होते? हिंदू म्हणून जन्माला येणे, हा काही गुन्हा आहे का? पाकिस्तानची आयएसआय व तेथील लष्करी अधिकारी तरुणांची माथी भडकावून त्यांच्याकडून अशी कृत्ये घडवून आणतात. त्यामुळे या दहशतवाद्यांचा खात्मा केला, तरी तेवढ्याने चालणार नाही. त्याला खतपाणी घालणार्या, पाठबळ देणार्या, त्यांच्या डोक्यात धर्म व भारतद्वेषाचे विष पेरणार्या शक्तींचाच बंदोबस्त करण्याची वेळ आली आहे.

पहलगामचा हल्ला झाला, तेव्हा पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाच्या दौर्यावर होते तसेच अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हॅन्स हे सध्या भारत दौर्यावर आहेत. हल्ल्याची आखणी करणार्यांनी ही वेळ जाणीवपूर्वक निवडली असावी. पंचवीस वर्षांपूर्वी, म्हणजे २० मार्च २००० रोजी जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील छत्तिसिंगपोरा या गावी ३६ शिखांचे शिरकाण करण्यात आले होते. त्याच्या दुसर्याच दिवशी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन भारत भेटीस येणार होते. त्यावेळी पंतप्रधान वाजपेयी यांनी, या हल्ल्यात पाकितानचा हात असल्याची माहिती क्लिंटन यांना दिली होती. त्यानंतर दोनच वर्षांनी अमेरिकेचे परराष्ट्र उपमंत्री बी. रोक्का भारताच्या दौर्यावर असतानाच, काश्मीरमधील कालुचक येथे लष्करी जवानांच्या निवासस्थानात शिरून दहशतवाद्यांनी २३ जणांची हत्या केली होती. पाकिस्तानी दहशतवाद्यांनी अमरनाथ यात्रेकरूंना पुन्हा पुन्हा लक्ष्य केले असून, त्यांचा कुटिल डाव अनेकदा उघड झाला आहे. २००५ मध्ये एका सरकारी शाळेसमोर स्फोटकांनी भरलेली कार उडवून दिल्याने विद्यार्थी मृत्युमुखी पडले होते. पहलगाम हल्ल्यात विविध राज्यांतील व्यक्तींचा बळी गेला असून, त्यामध्ये आठजण महाराष्ट्रातील आहेत. तर दोन विदेशी नागरिकही यात बळी पडले आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हल्ल्याच्या रात्रीच काश्मीरमध्ये गेले आणि पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून भारतात परतले. दहशतवाद्यांना माफी नाही आणि त्यांच्याविरोधातील लढ्याचा निर्धार अभेद्य आहे, असे मोदी यांनी ठणकावले आहे. मात्र काही दिवसांपूर्वीच अशा प्रकारचा हल्ला होण्याची शक्यता असल्याचा इशारा गुप्तचर यंत्रणांनी दिला होता. त्यादृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली नाही, हे स्पष्ट आहे. यास जबाबदार कोण, याचाही शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज आहे. जम्मू-काश्मीरची अर्थव्यवस्था संपूर्णपणे पर्यटनावरच अवलंबून असून, पर्यटकांना जीविताची सुरक्षा मिळाली नाही, तर काश्मीरमध्ये यापुढे कोणीही फिरकणार नाही.

जम्मू-काश्मीरमधली स्थिती पूर्णतः पूर्वपदावर आल्याचा दावा केंद्र सरकार तसेच नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी केला होता, पण वास्तव तसे नाही. शिवाय दहशतवादी काही दिवसांपूर्वीच त्या भागात आले होते, अशी माहिती प्रसिद्ध झाली असून, स्थानिकांची मदत असल्याशिवाय अशा प्रकारचा हल्ला करता येणे कठीण आहे. अशा देशद्रोही स्थानिक प्रवृत्तींनाही ठेचावेच लागेल. खुद्द पाकिस्तान दहशतवादाच्या आगीत होरपळत असतानाही त्याला अजूनही शहाणपण आलेले नाही. अडीअडचणीला आपल्या मदतीस चीन आहेच, या विश्वासाच्या बळावर पाकिस्तान उड्या मारत आहे. दहशतवाद पोसणार्या, त्याद्वारे सीमेपार कारवाया घडवून आणणार्या आणि भारतात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करणार्या पाकिस्तानच्या नांग्या ठेचण्याची वेळ आली आहे. या देशाला दहशतवादी राष्ट्र घोषित करण्याच्या दिशेनेही भारताने पावले टाकली पाहिजेत.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात शासनाचा आदिवासी अध्यासन केंद्र स्थापनेचा निर्णय

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचा सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र स्थापन करण्याचा महाराष्ट्र शासनाने नुकताच निर्णय घेऊन याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रात आदिवासी बहुल क्षेत्र मोठए प्रमाणावर आहे. या परिक्षेत्रातील आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण व्हाव्यात, उच्च शिक्षणाच्या संधीचा लाभ मिळावा, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र सुविधा व त्याव्दारे आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, याकरिता कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठामध्ये आदिवासी अध्यासन केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठविला होता. त्यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असून या केंद्रास शासनाने मंजुरी दिली आहे. त्याबद्दल त्यांचे आदिवासी शिष्टमंडळाने भेटून अभिनंदन केले. महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियात नमूद केलेल्या उद्दिष्टां व्यतिरिक्त मानववंशशास्त्र अभ्यास माडिया, गोंडी, बैगा, कोलम इ. आदिवासी भाषा, संस्कृती व जीवनशैली जतन, आदिवासी ज्ञान, कला, संस्कृती, परंपरा, रितिरिवाज, उपजिविका अभ्यास आणि आर्थिक सक्षमीकरण जसे, पर्यावरणीय पर्यटन, वन पर्यटन, जलमार्ग व्यवस्थापन, जंगलांशी संबंधित धातूशास्त्र, कापड आणि त्याचे उत्पादन तंत्रज्ञान , औषधी वनस्पतींचा अभ्यास, खनिजशास्त्र, आदिवासी विद्यार्थ्यांचे उच्च व तंत्र शिक्षणातील प्रमाण वाढविण्या साठी त्यांना दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था करणे आणि त्याव्दारे त्यांना रोजगारक्षम बनविणे, याकरिता हे अध्यासन केंद्र स्थापन करण्यामागील उद्दिष्टे आहेत.

या उद्दिष्टांबाबत अभ्यास व संशोधन या स्थापन होणा-या अध्यासन केंद्रात होणार आहे.

शासनाच्या विविध विभागां कडून राबविल्या जाणा-या आदिवासी विकासासाठीच्या योजना व कार्यक्रमाचे मूल्यमापन, मूल्यांकन तसेच त्यासंबंधी धोरणात्मक शिफारसी करण्याची कार्यवाही संबंधित विभागाला या अध्यासन केंद्रामार्फत करावी लागणार आहे. या केंद्रासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षते खाली मुंबई, जळगांव, नांदेड, अमरावती, गडचिरोली या विद्यापीठांचे कुलगुरू सदस्य असलेली समन्वय समिती गठित केली असून सदस्य सचिव उच्च व तंत्र शिक्षण संचालक असतील. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या प्रयत्नांमुळे विद्यापीठाला शासनाने आदिवासी अध्यासन केंद्र मंजूर केल्याबद्दल औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावतीचे माजी प्राचार्य श्री पुरुषोत्तम कुमरे, विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाच्या डॉ. मनिषा कोडापे, प्र- कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक श्री विठ्ठल मरापे, अभियंता श्री आकाश सोळंके, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावतीचे माजी अधीक्षक श्री भारत किनाके, विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्राच्या कु. ज्योती गेडाम, महाविद्यालयीन विभागाच्या सौ. माधुरी सोळंके, परीक्षा विभागातील श्री निकेश भोसले यांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे अभिनंदन केले आहे.

# शेतकरी उत्पादक कंपन्यांना फळ व भाजीपाला शीतसाखळीसाठी मोठ्या प्रमाणात अनुदान

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय फलोत्पादन मंडळामार्फत फलोत्पादन समूह विकास कार्यक्रम २०२१ पासून प्रायोगिक तत्वावर राबविण्यात असून सन २०२५ मध्ये नवीन मार्गदर्शक सुचनांन्वये दोन संकल्पनांचा समावेश नव्याने करण्यात आलेला आहे.

प्रमुख शहरांच्या जवळ मोठ्या प्रमाणात भाजीपाला उत्पादनासाठी क्लस्टर्स विकसित करणे, भाजीपाला संकलन, साठवणूक आणि विपणन यांची व्याप्ती वाढविण्यासाठी शेतकरी उत्पादक संस्था, सहकारी संस्था आणि नव उद्योजक संस्था यांना प्रोत्साहन देणे, देशांतर्गत आणि निर्यात बाजारपेठेत स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी एकात्मिक पध्दतीने लॉजिस्टिक्स, मार्केटिंग आणि ब्रँडिंगमध्ये पूर्व-उत्पादन, उत्पादन, काढणीनंतरचे व्यवस्थापन आणि मूल्यवर्धन याद्वारे कृषी मूल्य साखळीच्या अडचणी दूर करणे व उत्पादनाच्या कापणीनंतर हाताळणी, मूल्यवर्धन आणि बाजार जोडणी या करिता पायाभूत सुविधांचा विकास/विस्तार/सुधारणा करणे हे या योजनेचे उद्देश आहेत.

**पात्र लाभार्थी-** शेतकरी उत्पादक संघटना (ऋझजी/ऋझउ) आणि त्यांच्या फेडरेशन, सहकारी संस्था/सोसायट्या, भागीदारी संस्था, कंपन्या किंवा त्यांचे संयोजन यांचा समावेश असलेल्या कायदेशीर संस्था या सदर योजनेअंतर्गत अंमलबजावणी संस्था (ख-) म्हणून पात्र असतील.

१) पुर्व उत्पादन आणि उत्पादन शेतकर्यांची क्षमता बाधंणी, पिकाचे लागवड साहित्य, पिक निगा पध्दती, सुक्ष्म सिंचन आणि पिक कापणीपर्यंत शेतीचे यांत्रिकीकरणाचा समावेश. सदर व्हर्टिकल मध्ये ऋझउ/ऋझज आणि अंमलबजावणी यंत्रणा यांनी राबविण्याच्या घटकांचा समावेश आहे.

२) काढणी नंतरचे व्यवस्थापन आणि मुल्यवर्धन - पिक कापनीनंतर हाताळणी, स्टोअरेज, मुल्यवर्धन आणि पॅकेजिंग.

३) लॉजिस्टिक्स, मार्केटींग आणि ब्रँडींग-क्लस्टर ब्रँडींग आणि देशांतर्गत आणि निर्यातीसाठी एकात्मिक लॉजिस्टिक.

**समाविष्ट पिके-**क्लस्टरमध्ये प्रमुख फलोत्पादन पीक असणे आवश्यक. या प्रमुख पिकाव्यतिरिक्त, क्लस्टरमध्ये कृषी विविधता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी अतिरिक्त फलोत्पादन पिके देखील समाविष्ट केली जाऊ शकतात.

**निवडीचे निकष-**क्लस्टरचा समावेश असलेली जमीन ही शक्य तितक्या प्रमाणात सलग असावी. जर जमीन क्षेत्र संलग्न नसेल तर कमाल दोन ठिकाणांमधील अंतर डोंगराळ भागात असल्यास ५० किमी आणि सर्वसाधारण भागात असल्यास ८० किमी पेक्षा जास्त नसावे.

किमान वार्षिक Farm gate Value = १००.०० कोटी

***अर्थसहाय्याचे स्वरूप***

घटकांतर्गत प्रकल्पातील मुख्य पिकाच्या ऋा ऋीश तरश्रींश च्या २५% एवढे अर्थसहाय्य देय आहे.

**१) पेरी-अर्बन उत्पादन**

अ) ऋझउ/ऋझज यांनी राबविण्याचे घटक पिकाचे लागवड साहित्य, शेतीचे यांत्रिकीकरण, सुक्ष्म सिंचन, एकात्मिक अन्नद्रव्य/किड व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान इ.

ब) अंमलबजावणी यंत्रणा यांनी राबविण्याचे घटक - ऋझज ची स्थापना व प्रोत्साहन, शेतकऱ्यांची/ऋझज यांची क्षमता बाधंणी, सुधारीत कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब आणि प्रसार, शेतीचे यांत्रिकीकरण, सुक्ष्म सिंचन इ.

**२) काढणीपश्चात व्यवस्थापन आणि वितरण**

संकलन व वितरण केंद्र, एकात्मिक पॅक हाऊस, रायपनिंग चेंबर, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतवाहन, प्रक्रिया केंद्र यांची निर्मिती व विस्तारीकरण, शीतगृह उभारणी, मुल्यवर्धन आणि पॅकेजिंग इ. सदर घटक हे अंमलबजावणी यंत्रणांनी राबवावयाचे आहेत.

**अनिवार्य पिके-** टोमॅटो, कांदा आणि बटाटा याव्यतिरिक्त कोबी, फ्लॉवर, भेंडी, वांगी, शिमला मिरची, काकडी, दुधी भोपळा, कोथिंबीर, लिंबू, आले, हिरवी मिरची, लसूण इ.

**निवडीचे निकष-** क्लस्टर आणि त्यामध्ये विकसित करायच्या सर्व प्रस्तावित पायाभूत सुविधा उपभोग केंद्र/शहरापासून ५० ते १०० कि.मी. (५० कि.मी. - १० लाख लोकसंख्येसाठी, ८० कि.मी. - १० ते १५ लाख लोकसंख्येसाठी आणि १०० कि.मी. - १५ लाखांहून अधिक लोकसंख्येसाठी) असले पाहिजेत.

कृषी विशेष




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# मायक्रोवेव्हच्या रेडिएशनमुळे कॅन्सर होतो का ? जाणून घ्या सत्य



**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत मायक्रोवेव्ह हे उपकरण प्रत्येक घरात नेहमीच्या वापरात दिसतं. काही क्षणांत अन्न गरम करणं, उरलेले पदार्थ शिजवणं किंवा थेट पाककृती तयार करणं हे सगळं या यंत्रामुळे सहज शक्य झालं आहे. मात्र याच्या वापराबाबत अजूनही समाजात अनेक गैरसमज आहेत. काही लोकांना वाटतं की मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम केल्याने त्यातील पोषणमूल्य नष्ट होतं, तर काहींना असेही वाटते की हे अन्न खाल्ल्याने आरोग्यावर वाईट परिणाम होतो. काहींच्या मते मायक्रोवेव्हमधील किरणांमुळे कॅन्सरचा धोका वाढतो. पण हे सगळं खरंच आहे का?

**मायक्रोवेव्हमधून अन्न 'रेडिओऍक्टिव्ह' होतं हा समज चुकीचा**

वास्तविक पाहता मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम केल्याने त्यातील पोषणमूल्य नष्ट होत नाहीत, उलट कमी पाणी आणि कमी वेळ लागल्यामुळे अन्नातील महत्त्वाची पोषकतत्त्व जास्त प्रमाणात टिकून राहतात. विशेषतः भाजीपाला किंवा फळे हलक्या तापमानावर मायक्रोवेव्हमध्ये गरम केल्यास उकळण्याच्या तुलनेत अधिक पोषण शिल्लक राहतं.

मायक्रोवेव्हमध्ये वापरलं जाणारं रेडिएशन हे 'नॉन-आयोनायझिंग' प्रकारात मोडतं, जे आपल्या शरीरातील पेशींना किंवा डीएनएला कोणताही धोका देत नाही. ते फक्त अन्नातील अणूंना हालचाल करायला लावतं आणि त्यामुळे उष्णता निर्माण होते. त्यामुळे, मायक्रोवेव्हमधून अन्न 'रेडिओऍक्टिव्ह' होतं हा समज चुकीचा आहे.

मायक्रोवेव्हमुळे कॅन्सर होण्याची शक्यता असते?

काही जणांना वाटतं की मायक्रोवेव्हमुळे कॅन्सर होण्याची शक्यता असते, मात्र याबाबत कोणताही वैज्ञानिक आधार किंवा पुरावा आजवर समोर आलेला नाही. याउलट, जागतिक आरोग्य संघटना (थकज) आणि अमेरिकन अन्न व औषध प्रशासन (णड ऋऊ-) या संस्था मायक्रोवेव्हचा वापर सुरक्षित मानतात.

मात्र, मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम करताना 'चळलीींश डरषश' अशी खूण असलेली भांडीच वापरणं अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा, प्लास्टिक वितळून अन्नात रसायनं मिसळण्याची शक्यता असते, जी शरीरासाठी हानिकारक ठरू शकते.

अन्नपदार्थाला वारंवार गरम केल्याने ते विषारी होतंअनेकदा लोक एकाच अन्नपदार्थाला वारंवार गरम करतात आणि त्यामुळं ते विषारी होतं, असा समज असतो. प्रत्यक्षात, अन्न योग्य प्रकारे गरम केल्यास ते विषारी होत नाही.

हो, चव आणि पोषणमूल्य थोडं कमी होऊ शकतं, पण ते आरोग्यास हानिकारक ठरत नाही. म्हणून, गरम करताना अति गरम होणार नाही याची काळजी घेतल्यास मायक्रोवेव्हचा उपयोग हा सहज, सुरक्षित आणि आरोग्यदायी असतो.

# आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचा समारोप, विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती -**

आपत्ती व्यवस्थापन व मदत कक्ष आणि भारतीय हवामान खात्याच्या वतीने आज आपत्ती व्यवस्थापन आणि हवामान बदल याबाबत कार्यशाळा उत्साहात पार पडली. अमरावती विभागातील स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते, नागरिक आणि शासकीय कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला.कार्यशाळेत येत्या मान्सूनच्या काळात आणि उन्हाळ्यात येणाऱ्या संभाव्य समस्यांबाबत माहिती सांगितली. उन्हाळ्यात प्रामुख्याने उष्णतेच्या लाटा आणि त्यानुषंगाने निर्माण होणाऱ्या समस्यांची माहिती देण्यात आली. भारतीय हवामान खाते है आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करीत असल्यामुळे हवामानाबाबत अचूक अंदाज मिळत आहे. कमी, मध्यम आणि दीर्घ कालावधीबाबत हवामानाचाअंदाज व्यक्त करण्यात येतो.



त्यामुळे हवामान खात्याकडून सूचना प्राप्त होताच यंत्रणांनी त्यानुसार सज्ज राहणे गरजेचे आहे. मान्सूनच्या कालावधीत पूर, वीज पडणे, गारपिठ यामुळे नैसर्गिक आपत्ती ओढवू शकते. कार्यशाळेत संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना कसा करायचा, प्रथमोपचार कसा द्यायचा आणि : सुरक्षिततेसाठी कोणती काळजी घ्यायची याबद्दल तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. भूकंप, आग आणि पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी घ्यावयाची खबरदारी आणि आवश्यक उपाययोजना यावर विशेष भर देण्यात आला. जिल्हाधिकारी सौरभ : कटियार यांनी कधीही येऊ शकणाऱ्या आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रत्येकाने सज्ज राहणे आवश्यक आहे. कार्यशाळेतील ज्ञानाचा उपयोग आपत्कालीन परिस्थितीतील आपगस्तांच्या मदतीसाठी होणार असल्याचे सांगितले. यावेळी : जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २४ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण


# हिंदू पर्यटकांवर झालेल्या पहलगाम दहशतवादी भ्याड हल्लया विरोधात शिवसेना आक्रमक

## परतवाडा जयस्तंभ चौकात पाकिस्तान विरोधात प्रचंड नारेबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अचलपूर:**
जम्मू काश्मीर मधील पहलगाम मध्ये झालेला दहशतवादी हल्लयामध्ये अनेक हिंदू भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला याचा निषेध जयस्तंभ चौक, परतवाडा येथे शिवसेना, युवासेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख ड. ठाकूर प्रमोद सिंह गड्रेल आणि युवासेना जिल्हा प्रमूख प्रितेश अवघड यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. शिवसेनेचे तालुकाप्रमुख



विवेक महल्ले, परतवाडा शहर प्रमुख विलास सोळंकी, अचलपूर शहर प्रमुख आतिश अहिर यांच्या नेतृत्वात झालेल्या निषेध आंदोलनात निष्पाप हिंदू पर्यटकांची निघुण हत्या करणाऱ्या विरोधात पाकिस्तान मुर्दाबाद,आतंकवाद मुर्दाबाद, प्रचंड नारे बाजीने परिसर दणाणून गेला होता. शिवसेनेचे आंदोलन असल्याने पोलिसांनी दुपारपासूनच आंदोलन भागात प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. संपूर्ण देशात पाकिस्तान आणि दहशतवाद विरोधात रोष व्यक्त होत आहे. आतंकवाद्यांच्या सात पिढ्या लक्षात ठेवतील अशा प्रकारची कारवाई भारत सरकारने करावी अशी मागणी आंदोलनात दरम्यान शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केली. यावेळी अरविंद सुरवोसे सर,राजू केदार,संजू हिरपुरकर ,महिला आघाडी तालुका प्रमुख वनिता देशमुख,महिला शहर प्रमुख श्रद्धा विटाळकर ,उपशहर प्रमुख सुनिल चित्ते,उपशहर प्रमुख रितेश कोठाळे,पंकज पर्वतकर, राम मासोदकर,युवासेना शहर प्रमुख विशाल गौर,राहुल वखरे,मोहन गौर,पवन फाटे,बाबा चावरे, निलेश गुहे यांच्यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

# पहलगाम हल्लयाच्या निषेधार्थ उद्या अमरावती बंद

## विहिंप, बजरंग दल, हिंदुत्ववादी संघटनांचे आवाहन

## राजकमल चौकात सकाळी १० वाजता निदर्शने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती –**
जम्मू-काश्मीरमधील पहलगामयेथे मंगळवार, २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि सर्व हिंदुत्ववादी संघटनांनी शुक्रवार, २५ एप्रिल रोजी अमरावती बंदचे आवाहन केले आहे. २५ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता राजकमल चौकात पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात येईल.सर्व बाजारपेठा बंद राहणार बंटी परवानी यांनी या बंद बद्दल सांगितले की, शुक्रवार, २५ एप्रिल रोजी अमरावती बंद दरम्यान शहरातील बाजारपेठेतील सर्व दुकाने बंद राहतीलहा बंद यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.



### कठोर कारवाईची जनतेची मागणी

पहलगाममधील या हल्लयाने लोकांमध्ये संतापाची तीव्र लाट निर्माण झाली आहे. त्यामुळे जनता आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून या दहशतवादी हल्लयासाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाईची मागणी करत आहेत. पुलवामा येथील दहशतवादी हल्लयानंतर पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानविरुद्ध केलेल्या कारवाईप्रमाणेच पाकिस्तानला पुन्हा एकदा धडा शिकवला पाहिजे, असे लोकांचे म्हणणे आहे.

# पहलगाम हल्लयातील मृतकांना भावपूर्ण श्रद्धांजली

## अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती,**जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्लयात २६ निष्पाप लोकांचा मृत्यू झाला आहे. यादहशतवादी हल्लयाचा निषेध करीत अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने हल्लयातील मृतकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मेणबत्ती पेटवून हल्लयात शहीद झालेल्या नागरिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. बुधवारला सायंकाळी राजकमल चौकात या श्रद्धांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी श्रद्धांजली कार्यक्रमाला खा. बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, मुन्ना राठोड, अशोक डोंगरे, निलेश गुहे, अनिकेत ढेंगळे, समीर जवंजाळ, वैभव देशमुख, पंकज लुंगीकर, बंडू हिवसे, गजानन राजगुरे, अभिनंदन पेंढारी, अरुण जयस्वाल, विजय खंडारे, अरुण बनारसे, पंकज मेश्राम, विकी वानखडे, रवींद्र शिंदे, काँग्रेस महिला शहर अध्यक्षा जयश्री वानखडे, सुजाताझाडे, शोभा शिंदे, भारती क्षिरसागर, संजय वाघ, गुड्डू हमीद, आदित्य साखरे, योगेश गावंडे, व्यास, नजीर भाई बी के गजानन रडके, किशोर पाटील यांच्यासह शहर काँग्रेस व युवक काँग्रेस तसेच महिला काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.



# आरटीई प्रवेश प्रक्रिया शनिवारपासून प्रतीक्षा यादीतील तिसरी फेरी

## प्रवेश आकडा निश्चितीसाठी शुक्रवारची डेडलाइनपहील्या फेरीअंती १६५३ प्रवेश निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती,**
शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमध्ये राखीक असणाऱ्या २५ टक्के जागांवर पहील्या फेरीअंती जिल्ह्यातील १ हजार ६५३ बालकांचे शाळांमध्ये प्रवेश निश्चित झाल्याने. दुसऱ्या फेरीला २१ एप्रिल पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या या फेरीतील प्रवेशाचा आकडा समित्यांकडून अप्राप्त असल्याने त्यांना शुक्रवारपर्यंतची डेडलाईन देण्यात आली आहे. त्यानंतर शनिवार पासून प्रतिक्षा यादीतील तिसऱ्या फरीला सुरूवात होईल.२०२५-२६ या शैक्षणिक वर्षांकरिता आरटीई अंतर्गत जिल्ह्यात २२५ शाळांमध्ये २ हजार ४३० जागांकरिता आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. याअंतर्गत २ हजार ३९६ पैकी केवळ १हजार ६५३ पाल्यांचेच प्रवेश निश्चित झाले आहेत. परंतु दोनदा मुदत वाढ देऊनही पहिल्या फेरीतील




पालकांचा प्रवेशासाठी रिस्पॉन्स न मिळाल्याने अखेर पहिली फेरी शासनाकडून १ एप्रिल रोजी बंद केली. त्यामुळे या पहिल्या फेरीतून रिक्त राहिलेल्या ७७७जागांकरिता आता प्रतीक्षा यादीतील बालकांना संधी दिली जात आहे. ८ ते १५ एप्रिल पर्यंत आरटीईच्या दुसऱ्या फेरीला सुरूवात करण्यात आली होती. परंतु त्यानंतरही जागा रिक्त असल्याने शासनाकडून याला पुन्हा सहा दिवसांची म्हणजे २१ एप्रिल पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु या फरीअंती प्रवेश निश्चित झाले याचा आकडा तालुका व शहर पडताळणी समित्यांकडे समित्यांकडे रखडलेला आहे. त्यामुळे या समित्यांना ४ दिवसांची २५ एप्रिल पर्यंत प्रवेशाचा आकडा निश्चित करून त्याचा अहवाल शिक्षण विभागाकडे पाठविण्याचे आदेश देण्यात आले आहे. त्यामुळे शनिवारी २६ एप्रिल पासून प्रतिक्षा यादीतील तिसऱ्या फेरीला सुरूवात होणार आहे.

# सुर्सदा चेकपोस्टवर वन विभागाची कारवाई

## १.८७ क्विंटल सालई डिंकासह ३ तस्करांना अटक

### मध्यप्रदेश मध्ये जात होते विक्रीसाठी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२४धारणी–** धारणी तालुक्यातील सुसर्दा ते डाबका दरमयान मुख्य मार्गावरून मध्यप्रदेशकडे तस्करीने जात असलेला सालई डिंकसह तिघांना वन विभागाने पकडले. या कारवाईने पुन्हा एकदा डिंकाची तस्करी उजेडात आली आहे. कारवाईमुळे नविन रेंजर बनसोडे मॅडमचे कौतुक होत आहे.प्रादेशिक वन विभागाच्या सुसर्दा रेंजच्या रेंजर बनसोडे मॅडम यांनी विशेष पथकाचे सहकार्याने सुसर्दा ते डाबा रोड वर १ किंटल ८७ किलो




प्रतिबंधित व महागडे सलाई झाडाचेडिंक पकडलेतर तीन जणांना मुद्देमालासह अटक करण्यात आल्याने तस्करांचे धाबे दणाणले आहे. उपरोक्त सालई डिंक धुळघाट आणि सुसर्दा रेंजच्या जंगलातील सालईच्या झाडांमधून चोरट्या स्वरूपात आणि अनैसर्गिक पध्दतीने काढण्यात आल्याची गंभीर माहिती आहे. या अप्राकृतीक पध्दतीमुळे मेळघाटातील सालई वृक्षाचे जीवन धोक्यात आलेले आहे.



माहिती प्रमाणे मंगळवारी श्रीराम मावस्कर, सोपान जांबेकर आणि दिलीप तिघेही रा. चेंडो, ता. धारणी यांना १ क्विंटल ८७ किलो डिंकासह अटक करण्यात आली. या कारवाईत रेंजर बनसोडे मॅडमच्या नेतृत्वात राऊंड अधिकारी जय मेटकर, राठोड, सावरकर यांनी सहकार्य केले.

तिन्ही आरोपींना कोर्टात हजर करण्यात आणि पुढील विस्तृत तपास अधिकारी मेटकर करत आहे. सनद अशी की सालई डिंक काढणे, जतन करणे, वाहतुक करणे, विक्री करणे, खरेदी करण्यावर प्रतिबंध आहे. तस्करीमध्ये एकूण ६ ते ८ आरोपी होते. काही पळून गेले असल्याची माहिती आहे. धुळघाट व सुसर्दा यादोन वनपरिक्षेत्रात सालईच्या वृक्षातून नियमितपणे अप्राकृतीक पध्दतीने डिंक काढून झाडांचे वय कमी करणे तस्करांनी सुरू करून पर्यावरणाला धोका निर्माण केलेला आहे.

# अमरावती बाजार समितीचा स्तर घसरलापणनच्या वार्षिक क्रमवारीत १७ ने घसरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती–**
कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेल्या व शेतकऱ्यांना नगदी चुकारे देण्यात अव्वल असलेल्या अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचा स्तर यंदा चांगलाच घसरला आहे. पणन संचालनालयाने जाहीर केलेल्या बाजार समितीच्या वार्षिक क्रमवारीत अमरावती बाजार समितीचा २६ क्रमांक लागला आहे. गतवर्षी ही बाजार समिती नवव्या क्रमांकावर होती.जिल्ह्यातील चादरबाजार समिती पाचव्या क्रमांकावर आहे. शेतकऱ्यांच्यासोयीसुविधासह शेतमाल विक्रीसाठी असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीमधील पायाभूत सुविधा, आर्थिक कामकाज, वैधानिक कामकाजासह नावीण्यपूर्ण उपक्रमावर बाजार समितीचा




दर्जा ठरविण्यात येतो. चार निकषांवर गुणांकन करण्यात येते. दोनशे गुणाच्या या परीक्षेत गुण मिळवणाऱ्या बाजार समितींना प्राप्त गुणाच्या आधारे क्रमांक दिले जातात. राज्यातील ३०५ बाजार समितीचे परीक्षण करण्यात आले. त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार येथील बाजार समिती १५५.५ गुण मिळवून राज्यात पाचव्या क्रमांकावर आली आहे.

जिल्ह्यातील सर्वांत मोठी अमरावती बाजार समितीचे गुणांकन मात्र कमालीचे घसरले आहे.

दरवर्षी १५ ते २० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवणाऱ्या या बाजार समितीत जिल्ह्यासह बाहेर जिल्ह्यातील व परप्रांतातील शेतकरी आणि व्यापारी शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी येतात. सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण असलेल्या अमरावती बाजार समितीचा या परीक्षेत मात्र गुणांकन कमालीचा घसरला आहे. या परीक्षेत अमरावती बाजार समितीला १३५ गुण मिळाले असून ती २०२३-२४ च्या वार्षिक क्रमवारीत २६ वी आली आहे. हा क्रम १७ ने घसरला आहे.

# धर्मादाय रुग्णालयांवर आता तपासणी पथकाचा वॉच; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई –** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा धर्मादाय रुग्णालयांच्या नियंत्रणासाठी धर्मादाय आयुक्त, आरोग्य विभाग आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांच्या समन्वयातून विशेष तपासणी पथक तयार करण्याचे निर्देश बुधवारी येथे दिले.

धर्मादाय रुग्णालयांकडून निर्धन, गरीब रुग्णांवर उपचार मोफत व्हावेत. रुग्णालयांनी शिल्लक खाटा, निर्धन रुग्ण

### सीएम फंडाची माहिती मोबाइलवर मिळणार

राज्य शासनाच्या विविध सेवा व्हॉट्सपवर उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने 'मेटा'सोबत करार केला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री सहायता निधीची संपूर्ण प्रणाली व्हॉट्सपवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश फडणवीस यांनी दिले.

निधींची माहिती ऑनलाईन प्रणालीत नोंद करावी. काही रुग्णालयात अनामत रक्कम घेतल्याशिवाय उपचार केले जात नसल्याच्या तक्रारींची गंभीर दखल देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या आढावा बैठकीत घेतली. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. धर्मादाय आयुक्तांच्या अंतर्गत विभागनिहाय स्वतंत्र अधिकारी नेमावेत, असे फडणवीस म्हणाले. धर्मादाय विश्वस्त



नियमानुसार धर्मादाय रुग्णालयात १० टक्के खाटा निर्धन घटक तर १० टक्के खाटा दुर्बल घटकातील रुग्णांसाठी आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. राज्यातील प्रत्येक धर्मादाय रुग्णालयात रुग्णांच्या योजना, आजार, उपचाराबाबतच्या माहितीचे

### ऑनलाइन माहिती सक्तीची

धर्मादाय कार्यालयाकडे नोंदणी करणाऱ्या रुग्णालयांनी रुग्णांना दिलेल्या उपचाराची माहिती, रुग्ण, शिल्लक खाटा यांची माहिती ऑनलाईन प्रणालित भरणे सक्तीचे करावे. महापालिका क्षेत्रात जागा आणि इतर सवलती घेणाऱ्या आणि महसूल विभागाकडून जमीन सवलत घेणाऱ्या रुग्णालयाची यादी तयार करावी. याबाबत समन्वय करण्यासाठी क्लस्टर तयार करून समिती प्रमुख नेमून माहिती न भरणाऱ्या रुग्णालयावर कारवाई करण्याचे निर्देशही फडणवीस यांनी दिले.

मोठ्या अक्षरातील फलक लावावेत. सर्व माहिती जाहीररित्या सर्वांना उपलब्ध होण्यासाठी ऑनलाईन प्रणालीवर टाकावी. शिवाय एका डॅशबोर्डवर माहिती दिल्यास रुग्णांना मदत होणार आहे, असे फडणवीस म्हणाले.








## विद्यापीठ परिसरात असलेल्या जंगलात आग

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील जंगलाला बुधवारी दुपारच्या सुमारासभीषण आग लागली होती याआगीत विद्यापीठाच्या जंगलातील झाडे जळून खाक झाल्याची माहितीआहे।आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन विभागाच्या विभागाचे प्रयत्न सुरू, आगीचे कारण स्पष्ट, सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही घटनास्थळी कुलसचिव डॉ.अविनाश असनारे यांच्यासह विद्यापीठाचे अन्य अधिकारी उपस्थित होते

# पहलगामच्या घटनेचे राजकारण करण्याची गरज नाही - चंद्रशेखर बावनकुळे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४नागपूर-** नागपूर : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकावर भ्याड हल्ल्याची घटना मनाला सुन्न करणारी आहे. मात्र, या घटनेचे काही लोक राजकारण करून पोळी भाजण्याचा प्रयत्न करत आहे. अशा लोकांनी सरकारच्या पाठीमागे आणि या हल्ल्यात ज्यांचे जीव गेले त्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, असे मत राज्याचे महसूल मंत्री व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

बावनकुळे नागपूर विमानतळावर प्रसार माध्यमाशी बोलत होते. या घटनेचे राजकारण करण्याची गरज नाही. संपूर्ण देशाने सरकारच्या बाजूने उभे राहून महाराष्ट्र आणि केंद्र सरकारचे हात मजबूत केले पाहिजे. पण काही लोक राजकारण करत आहे. पहलगामच्या घटनेनंतर येथे झालेल्या हल्ल्याची संपूर्ण माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली आहे. मृतकामध्ये सहा लोक महाराष्ट्रातील आहे.अमरावती आणि नागपूर जिल्ह्यातील पर्यटकाशी मी सुद्धा संपर्कात आहे. सरकारने त्यांना महाराष्ट्रात परत आणण्यासाठी व्यवस्था करत आहे. तेथील पर्यटकांना धर्म विचारून हिंदुना जाणीवपूर्वक लक्ष्य करण्यात आले आहे. अशा पद्धतीची घटना दुर्दैवी आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सर्व या हल्ल्यातील मृतक आणि जखमी झालेल्या कुटुंबीयांच्या पाठीशी उभे आहे. या घटनेमध्ये संपूर्ण देश पाठीशी उभा करून एकसंघपणे सरकारच्या मागे उभे राहून मजबूत केले पाहिजे.

अमरावती नागपूर या ठिकाणी अडकलेल्या प्रवाशांशी संपर्क साधला आहे. तातडीने काय व्यवस्था करता येईल त्यासाठी प्रयत्न केला जात आहे. सर्वच स्तरावरून यासाठी प्रयत्न सुरू आहे. जम्मू काश्मीर येथे पर्यटकांची संख्या वाढत होती. कलम ३७० कलम हटवल्यानंतर तेथील वातावरण ज्या पद्धतीचा बदलत गेले आहे त्याला दहशतवाद्यांकडून गालबोट लावण्याचे काम करण्यात आले आहे. मात्र केंद्र सरकार अजून चांगले आणि शांत काश्मीर करण्याचा प्रयत्न करणार आहे असेही बावनकुळे म्हणाले.

### क्रीडा क्षेत्रात वनविभागाची भरारीमहाराष्ट्र संघामध्ये

## अमरावती वनविभागाची कु. ऐश्वर्या निलेश ढोके हिची निवड



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती -** नुकत्याच नई दिल्ली येथे पार पडलेल्या अखिल भारतीय नागरीक सेवा खो खो क्रीडा स्पर्धा २०२४- २५ मध्ये महाराष्ट्र संघामध्ये अमरावती वनविभागाची कू. ऐश्वर्या निलेश ढोके हिची निवड झालेली होती सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र महिला संघ प्रथम क्रमांक मिळवून विजयी ठरला आहे या स्पर्धे मध्ये आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर ऐश्वर्या हिला स्पर्धेतील सर्वोत्तम उत्कृष्ट खेळाडू म्हणून मान मिळालेला आहे ही अमरावती वनविभागासाठी अतिशय अभिमानाची बाब आहे, तसेच ऐश्वर्या हिचे ओडिशा येथे पार पडणाऱ्या महिला खुला गटामध्ये राष्ट्रीय संघात देखील निवड झालेली आहे. वनविभागामध्ये कार्यरत असलेल्या ऐश्वर्या ला अमरावती वनविभागाचे उपवनसंरक्षक मा. श्री.धैर्यशील पाटील सर, सहाय्यक वनसंरक्षक मा. श्री. ध्यानेश्वर देसाई सर तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी,चांदूर रेल्वे मा. श्री.भानुदास पवार सर यांनी अभिनंदन देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच अमरावती खो खो असोसिएशन चे अध्यक्ष मा. श्री. सुहास पांडे सर, सचिव मा. श्री. गजेंद्र रघुवंशी सर, प्रशिक्षक श्री. सतिश टपके, व श्री.मनोज ठोसर तसेच मराठा फ्रेंड्स क्लब व साई युवक क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी व खेळाडू यांच्या कडून ऐश्वर्या ला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# पहलगाम आंतकवादी हल्लयात मृतकांना श्रद्धांजली

### पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डींनी स्वीकारल्या नाहीत बर्थ डेच्या शुभेच्छा, बुके घेऊन आलेले अनेकजण परतले



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती-** सीपी नविनचंद्र रेड्डी यांचा आज २३ एप्रिल रोजी वाढदिवस होता. सीपींना शुभेच्छा देण्यासाठी अनेक नामांकित व्यक्ती, व्यापारी, लहान-मोठ्या संघटनेचे पदाधिकारी, नेते यांनी एक, दोन दिवसाआधी पासूनच नियोजन केले होते. तसेच अनेक जण बुके घेऊन पोलिस आयुक्तालयात आले सुध्दा होते. परंतु, कश्मिरमधील पहलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्लयात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. त्यामुळे या सर्व मृतकांना त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर सीपी रेड्डी यांनी त्यांच्या वाढदिवसाचे सर्व कार्यक्रम रद्द केले. तसेच कुणाच्याही शुभेच्छा स्वीकारल्या नाही. सीपींचा बर्थ डे म्हटलं की दिवसभर प्रोलिस आयुक्तालयात शुभेच्छा देणाऱ्यांची गर्दी असले. डीसीपी, एसीपी, ठाणेदारांसहसर्वच विभाग प्रमुख बुके व मिठाईचे डब्बे घेऊन सीपींना शुभेच्छा देतात. शहरातील नामांकित व्यक्ती, व्यापारी, लहान-मोठ्या संघटनेचे पदाधिकारी, नेते शिष्टमंडळांसह सीपींना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतात. आज सीपी नविनचंद्र रेड्डींचा वाढदिवस असल्याने पोलिस आयुक्तालयात शुभेच्छा देणाऱ्यांची यात्रा भरणार होती. शुभेच्छा देणाऱ्यांनी एक, दोन दिवसांपासून सीपींना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देण्याची तयारी सुध्दा केली होती. काही शिष्टमंडळ शुभेच्छा घेऊन पोलिस आयुक्तालयात दाखल देखील झाले. परंतु, कश्मिर येथील पहलमाग येथे झालेल्या आंतकवादी हल्लयात ३० पर्यटकांचा मृत्यू झाल्याने सीपी रेड्डी यांनी वाढ दिवसाचे सर्व कार्यक्रम रद्द केल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यामुळे शुभेच्छा देणाऱ्यांना मायुस होऊन परतावे लागले.

# चंद्रभानजी विद्यालयात उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन

### प्रशिक्षण शिबीरातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास - मान्यवरांचे प्रतिपादन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती-** येथून जवळच असलेल्या कुंड सर्जापूर येथील चंद्रभानजी विद्यालयात उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रभानजी विद्यालयाचे मुख्याध्यापक एन.टी.चव्हाण होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील सॉफ्टबॉल चे राज्य क्रीडा मार्गदर्शक स्वप्निल चांदेकर, धर्नुविद्याचे राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे, व्हॉलीबॉलचे राज्य क्रीडा मार्गदर्शक राहूल निवडंगे, बॅडमिंटनचे राज्य क्रीडा मार्गदर्शक रितेश अनंतवार, सुकळी केंद्राच्या केंद्र प्रमुख श्रीमती स्मृती बाबरेकर व शाळेतील ज्येष्ठ शिक्षक एस.पी. लाजूरकर आदी उपस्थित होते.यावेळी बोलतांना सॉफ्टबॉल या खेळाचे राज्य क्रीडा मार्गदर्शक स्वप्निल चांदेकर यांनी चंद्रभानजी विद्यालयाने क्रीडा क्षेत्रात मोठी मजल मारली आहे. आज या गावाचे व शाळेचे नाव राज्यस्तरावर घेतले जाते. उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिरातून खर्या अर्थाने विद्याथ घडविण्याचे काम येथे होत आहे. खेळाडूंना शासनाने आज अनेक संधी दिल्या आहेत. या संधीचा लाभ घेत अनेक खेळाडू चांगल्या पदावर कार्यरत आहे. त्यामध्ये या शाळेतील अनेक खेळाडूंचा समावेश आहे. त्यामुळे आज अशा शिबीराचे आयोजन करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. धर्नुर्विद्याचे राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांनी खेळातील अनेक दाखले देत, ग्रामिण भागातील विद्यार्थ्यामध्ये खेळाचे कसब असतात फक्त त्यांना योग्य दिशा मिळणे आवश्यक आहे. अशा शिबीरातून विद्यार्थ्यांना त्यांच्या उपजत गुणांना वाव देण्याची संधी प्राप्त करून दिल्याबद्दल त्यांनी शाळेचे अभिनंदन केले. व्हालीबॉलचे राज्य क्रीडा मार्गदर्शक राहूल निवडंगे यांनी सुध्दा ग्रामिण भागात ऐवढ्या उन्हाळ्यात विद्याथ क्रीडा सराव करीत आहे ही फार उत्तम बाब असून विद्यार्थ्यांनी खेळातून आपले करीअर घडवावे, शासन नेहमी खेळाडूंच्या पाठीशी असल्याचे ते म्हणाले.सुकळी केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीमती बाबरेकर यांनी चंद्रभानजी विद्यालयातील क्रीडा क्षेत्राचा गौरव करीत विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रासोबत अभ्यासाची कास धरून स्वतःला सिध्द करावे व आपल्या शाळेचे, आई-वडीलांचे नावलौकीक करावा असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.अध्यक्षस्थानावरून बोलतांना शाळेचे मुख्याध्यापक श्री.चव्हाण यांनी चंद्रभानजी विद्यालयात नेहमी खेळाडूंना प्रोत्साहित करण्याचे काम केले आहे. त्यामुळेच आम्ही आज राज्यस्तरावर नावलौकिक केला आहे. खेळाच्या माध्यमातून आमच्या शाळेतील अनेक विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत संधी मिळाली आहे. अशा शिबीरातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असतो असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून या शिबीराचे आयोजक क्रीडा शिक्षक शरद गढीकर यांनी या शिबीरात सॉफ्टबॉल, बेसबॉल, टेनिक्काईट, लेझीम, बॅन्ड बासरी, योगा, डंबेल्स आदी सोबत विविध कवायती तसेच सुंदर हस्ताक्षर याचे प्रशिक्षण देत आहे. शाळेचे माजी राष्ट्रीय खेळाडू व तज्ञांच्या सहकार्याने निशुल्क शिबीराचे हे आयोजन होत असल्याची माहिती त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली तसेच पाहुण्यांचा परिचय करून दिला.कार्यक्रमाचे संचालन व आभार आर.एस. मानकर यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत शाळेतील ज्येष्ठ शिक्षक एस.पी.लाजूरकर, कु. व्हि .के. राठोड, सौ.के. एस. लाजूरकर, कु.ए.पी. मांगे, शाळेची राष्ट्रीय खेळाडू सायली वासनिक यांनी केले. कार्यक्रमाच्या व शिबिराच्या यशस्वितेकरीता शाळे तील सी.ए.शेंडे, आर. एस.मडावी, माजी राष्ट्रीय खेळाडू विक्की सैरीसे, तेजस थोपाडे, गौरव उईके, गोविंद गंगोले, माहोरे यांच्यासह सर्व आजी माजी खेळाडू प्रयत्न करीत आहे.

# नीरज बँकेकडून ग्राहकांच्या ठेवी परत करण्यास टाळाटाळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ चांदूर रेल्वे :** दोन वर्षापूर्वी शहरात मोठ्या थाटामाटात सुरू झालेली नीरज मल्टिपर्पज बँकेचे व्यवहार अडचणीत आले असून, ग्राहकांच्या लाखोच्या ठेवी परत देण्यास बँक संचालक टाळाटाळ करीत असल्याची तक्रार खुद्द बँक शाखा व्यवस्थापकांनीच चांदूर रेल्वे पोलिसात केली आहे. यामुळे बँकेच्या ग्राहकांमध्ये धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहेत.

सूत्रांनुसार, स्थानिक गाडगेबाबा मार्केटमधील एका इमारतीत ११ सप्टेंबर २०२३ रोजी अमरावती येथील नीरज मल्टिपर्पज बँकेची सुरवात झाली होती. त्याचे संचालक युवराज भगवान गिन्हे असल्याचे कळते.

अल्पावधीतच ग्राहकांच्या पसंतीस उतरलेल्या नीरज बँकेजवळ कोट्यवधीच्या ठेवी जमा झाल्या.नियमित व्यवहारही लाखांच्या घरात गेला असल्याची माहिती मिळाली. या बँकेत एकूण तीन कर्मचारी आणि नऊ नियमित एजंट काम करीत होते. त्यांच्या माध्यमातून बँकेचा आर्थिक स्तर झपाट्याने उंचावला होता. परंतु, मागील महिन्यांपासून बँकेत पैसे विड्रॉल करण्यासाठी गेलेल्या ग्राहकांना त्यांचेच पैसे परत मिळण्यासाठी अडचण जात असल्याचे लक्षात आले.

पैसे परत देण्यास बँक टाळाटाळ करीत असल्याचे जाणवल्याने सर्वच ग्राहकांनी आपल्या ठेवी परत मागण्यास सुरुवात केली. शाखा व्यवस्थापकाने संचालक मंडळाकडे पैशांची मागणी केली असता, त्यांनाही मुख्य कार्यालयाकडून पैसे वेळेवर परत न मिळाल्याने त्यांनी बँकेचे कर्मचारी व एजंटच्या साहाय्याने पोलिसात बँकेकडून पैसे परत मिळत नसल्याबाबत तक्रार केली.

बँकेच्या एकंदरीत व्यवहारावर ग्राहकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. बँकेच्या संचालकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केले असता, त्यांचा फोन बंद आढळून आला.

# उष्ण शहरांच्या जागतिक यादीत विदर्भातील तीन शहरे, पुढील तीन दिवस तीव्र उष्णतेच्या लाटा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ नागपूर: -** विदर्भच नाही तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात देखील तापमानाचा पारा झपाट्याने उंचावतो आहे. विशेषकरून विदर्भातील शहरांमध्ये दररोज तापमानाचे नवे उच्चांक नोंदवले जात आहेत. आता तर जगभरातील उष्ण शहरांशी विदर्भातील शहरांची तापमानाच्या बाबतीत जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. दोन दिवसांपूर्वी विदर्भातील चंद्रपूर या शहराचे नाव तापमानाच्या बाबतीत जागतिक क्रमवारीत पहिले होते.

गेल्या काही दिवसात विदर्भाच्या शहरांची जगभरातील शहरांशी उष्णतेची स्पर्धाच लागली आहे. सर्वात उष्ण शहरांमध्ये बुधवारी ब्रम्हपुरी, चंद्रपूर, अकोला शहराने ४५ अंश सेल्सिअस पलीकडे जात तापमानाचा उच्चांक गाठला. तर दुसरीकडे नागपूरसह इतर चार शहरांमध्ये ४४ अंश सेल्सिअस पेक्षा अधिकच्या तापमानाची नोंद करण्यात आली.

सूर्याचे आग ओकणे सुरूच असून आजपासून तीन दिवस उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मंगळवारी चंद्रपूर शहरात ४५.८ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवले गेले. जागतिक पातळीवर ते दुसऱ्या क्रमांकाचे उष्ण शहर ठरले. बुधवारी त्यात



अंशतः घट झाली. तापमान तीन अंशाने कमी होत ४५.५ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवले गेले. तर त्याचवेळी जिल्ह्यातील ब्रम्हपुरी शहरात तापमान अंशतः वाढून ४५.६ अंशासह हे शहर जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर पोहचले आहे.

दुसरीकडे अकोला शहरातील तापमानाचा पारा उसळत ४५ अंश सेल्सिअसवर पोहचला आहे. इतर शहरात देखील तापमानाची घोडदौड कायम आहे. कधीकाळी लवकर थंड होणारी उपराजधानी म्हणजेच नागपूर शहरात तापमान २४ तासात अंशतः वाढून ४४.४ अंश सेल्सिअसवर पोहचले. मात्र, जाणीव ४५ अंश सेल्सिअस तापमान असल्यासारखी होती. तिकडे वर्धा ४४.७ अंश सेल्सिअस, अमरावती ४४.६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले.मात्र, यात धक्कादायक म्हणजे सर्वाधिक वनक्षेत्र असलेल्या गडचिरोलीचे तापमान ४४.६ अंश सेल्सिअसवर पोहचले आहे.

तर भंडारा, यवतमाळ, वाशिम शहरात तापमान ४३ अंश सेल्सिअस पेक्षा अधिक आहेत. गोंदियात पारा ४२.५ अंश सेल्सिअस पेक्षा अधिक आहे. प्रचंड वाढलेल्या तापमानाने नागरिकांची प्रचंड होरपळ होत आहे. उष्णतेमुळे काही नागरिकांचे मृत्यु झाल्याची माहिती आहे. दुपारनंतर रस्त्यावरील वर्दळही कमी झाली आहे. अशात सूर्याचा प्रकोप पुढेही कायम राहणार असून २३ ते २६ एप्रिलपर्यंत उष्ण लाटांचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

# बाजार समितीच्या १७ संचालकांना जिल्हा उपनिबंधकांनी बजावली 'शो कॉज' नोटीस

## बाजार समितीमध्ये राजकीय वॉर सहकारात एकच खळबळ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

बाजार समितीच्या व्यवस्थापनाने ४४ लाखांची विद्युत निविदा, सफाई कंत्राट, पुर्ननियुक्त्यांचे प्रकरण चांगलेच तापत आहे. या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी बुधवारी सभापतींसह १७ संचालकांना महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री अधिनियमाचे कलम ४५ (१) अन्वयेकारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

बाजार समिती कारभाराविरोधात शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रकाश साबळे, सचिव शेखर औगड, उपाध्यक्ष उमेश महिंगे, कोषाध्यक्ष राहुल तायडे यांनी शासन, प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्याकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. याबाबत चौकशी समितीच्या अहवाल अभिप्रायमध्ये ४४ लाख रुपये ई-निविदा व साफसफाई कंत्राट खर्च निधीमध्ये चौकशी अधिकारी सचिन पतिंगे व सुशील ठोके यांनी नियमबाह्य प्रकार असल्याचे स्पष्ट केले होते.चौकशी अहवाल अभिप्राय विरोधात बाजार समितीचा स्थगिती आदेश १३ मार्चला पणन संचालकांनी निरस्त (रद्द) ठरविला. २१ मार्चला जिल्हा उपनिबंधकांनी चौकशी अहवालाच्या अनुषंगाने खुलासा मागविला होता. बाजार समितीचा खुलासा ग्राह्य नसल्याने आता जिल्हा उपनिबंधकांनी सर्व संचालकांना कारणे दाखला नोटीस बजावली आहे.

> सर्व कामे नियमानुसार झालेली आहे. याबाबत
>
> 
>
> आम्ही दिलेला लेखी जबाब विचारात न घेता सहकार अधिकारी राजकीय दबावात नोटीस बजावीत आहे. आम्हीदेखील कायद्याने देऊ.
>
> **हरीश मोरे, सभापती, बाजार समिती, अमरावती.**

**६ मे रोजी सुनावणी**

डीडीआर यांनी बजावलेल्या कलम ४५ (१) च्या नोटीसवर अमरावती बाजार समितीच्या सर्व १७ ही संचालकांना ६ मे पूर्पत लेखी खुलासा सादर करावा लागेल. त्यानंतर या प्रकरणात सुनावणी होईल. निर्णय विरोधात गेल्यास संचालक पदावरून निष्कासित होऊ शकतात व आर्थिक नुकसान वसुलीची कारवाई होऊ शकते

# नागरिकांच्या समस्यांवर त्वरित उपाययोजना करा : तिवस्यात आढाव्यात खा. वानखडे यांचे निर्देश, माजी मंत्री यशोमती ठाकूर उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**



उन्हाळ्याच्या दिवसांत ग्रामीण भागात भारनियम, पाणीटंचाई, तसेच नागरिकांच्या अन्य समस्यांवर बुधवारी तिवसा तहसील कार्यालयाच्या सभागृहात आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली. नागरिकांना भेडसाविणाऱ्या विविध समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश खा. बळवंतराव वानखडे यांनी दिले, तर माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.सभेच्या सुरुवातीला काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, तसेच महिलांच्या अनेक समस्यांसाठी खा.बळवंतराव वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी सर्वप्रशासकीय विभागांना एकाच छताखाली आणण्यासाठी आढावा बैठकांचे धडकसत्र सुरू केले आहे. तिवसा तालुक्याच्या समस्यांना घेऊन बुधवारी (ता.२३) तहसील कार्यालयात तालुका आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.बैठकीला तहसीलदार मयूर कळसे, सा. यां. विभागाचे अधिकारी बोरसे, गटविकास अधिकारी अभिषेक कासोदेयांच्यासह नगराध्यक्षा प्रतिभा गौरखेडे, उपाध्यक्ष प्रिया विघ्ने, दिलीपराव काळपांडे, योगेश वानखडे, शिवदास मुसळे, रितेश पांडव, लुकेश केणे, मुकुंद पुनसे, संदीप आमले, वैभव वानखडे, राकेश चौधरी, पंकज कळंबे, संदीप ठाकरे, सूरज धुमनखेडे, सतीश पोजगे, शहजाद पटेल, छत्रपती डोंगरे, प्रणव वानखडे, अमर वानखडे, शशांक राऊत, रामू तांबे, नितीन अर्डक, खरेदी-विक्रीचे सभापती सुरेश मेटकर, बाजार समितीचे सभापती रवी राऊत यांच्यासह पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# अनोळखी युवकाचा रेल्वेतून पडून उपचारादरम्यान मृत्यू

## ओळखीचे असल्यास बडनेरा रेल्वे पोलिसांना संपर्क करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४धामणगाव रेल्वे**

२१ एप्रिल रोजी धामणगाव रेल्वे स्टेशन येथे ट्रेन नंबर २२८२७ पुरी सुरत एक्सप्रेस या धावत्या रेल्वेतून खाली पडून गंभीर जखमी होऊन औषधोपचारादर ३० वर्षीय युवकाचा मृत्यू झाला.दरम्यान रेल्वे पोलीस स्टेशन बडनेरा मार्ग क्रमांक १५/२०२५ कलम १८४ अनन्य मार्ग दाखल करण्यात आला आहे .सदर मयत युवक हा अंदाजे ३० वर्षाचा उंची अंदाजे १६६ सेंटीमीटर, निमगोरा सावळा शरीर बांधा सळपातळ ,केस भुरकट ,काळा रंगाचे गळद निळ्या रंगाचे फुल पॅन्ट, गुलाबी रंगाचा फुल बायाचा शर्ट, कत्या रंगाची अंडरवेअर ,उजव्या हातातील तर्जनी अनामिका व माध्यम या बोटात तीन पांढऱ्या रंगाच्या धातूच्या अंगठा तसेच डाव्या हातातील अनामिका बोटांमध्ये पांढऱ्या रंगाच्या धातूची अंगठी व मध्यम बोटात पिवळ्या रंगाची धातूची अंगठी होती. परंतु सदर मयत चे नाव अद्याप कळाले नसून तो कुठे राहतो व त्याचे नातेवाईक कोण हे माहिती नसल्यामुळे सदर मयतास कोणी ओळखत असल्यास किंवा त्याच्या नातेवाईक यांची माहिती असल्यास त्वरित रेल्वे पोलीस बडनेरा यांच्याकडे माहिती द्यावी असे आवाहन बडनेरा रेल्वे पोलिसांनी केले आहे.

# दुसरे विमान जम्मू आणि काश्मीरमधून मुंबईकडे रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४जम्मू**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाव येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर तिथे राज्यातील अनेक पर्यटक अडकून पडले होते. या पर्यटकांना सुखरूप मुंबईत घेऊन येणारे पहिले विमान काल पहाटे साडे तीन वाजता मुंबईत उतरले. तर आज दुपारी दोन वाजता उर्वरित पर्यटकांना घेऊन जाणारे दुसरे विमानही मुंबईकडे मार्गस्थ झाले.या विमानात एकूण १८४ पर्यटक असून त्यांना या विशेष विमानाने मुंबईत आणण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः त्यांच्याशी संवाद साधून त्याना आश्वस्त करून मुंबईकडे रवाना केले. यावेळी या पर्यटकांनी आवर्जून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. तसेच आमच्या संकटकाळी आमचा लाडका भाऊ मदतीसाठी धावून आल्याबद्दल समाधान वाटत असल्याची भावना त्यांच्याकडे व्यक्त केली. तसेच तत्पूर्वी शिंदे यांनी या पर्यटकांना त्यांच्या हॉटेल्समधून विमानतळाकडे रवाना केले.

# खुनाचा उलगडा; बडनेरा पोलिसांची जलद कारवाई, दोघांना अटक

## आंतरजातीय विवाहातून निर्माण झालेल्या कौटुंबिक वादातून खुन; गुन्हे शाखेच्या स्पेशल स्कॉडची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**



बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या एका खून प्रकरणाचा छडा लावत, गुन्हे शाखेच्या स्पेशल स्कॉडने अवघ्या काही दिवसांत दोघा आरोपींना अटक केली. मृतक रोशन महेंद्रसिंग नाईक (३४, रा. कृष्णानगर, तपोवन, अमरावती) याचा खून आंतरजातीय विवाहातून निर्माण झालेल्या कौटुंबिक वादातून करण्यात आला असल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रोशन नाईक याचे शव काही दिवसांपूर्वी इरविन रुग्णालय, अमरावती येथे मिळाले होते. त्याच्या आई बबिता नाईक यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बडनेरा पो.स्टे येथे अज्ञात व्यक्तीविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या सूचनेनुसार गुन्हे शाखेच्या स्पेशल स्कॉडने तपासाची चक्रे फिरवली. गुप्त माहितीच्या आधारे संशयित आरोपी रवि गंगाधर वानरखडे (३५) आणि दिनेश बंडू कुहाडकर (२६, दोघे रा. उदखेड पारडी) यांना अंजनगाव बारी परिसरातून ताब्यात घेण्यात आले.तपासादरम्यान आरोपी क्रमांक १ रवि वानरखडे याने कबुली दिली की, मृतकाचा त्याच्या बहिणीशी आंतरजातीय विवाह झाला होता. मात्र, हा विवाह रोशनला मान्य नव्हता आणि त्यामुळे नेहमी घरात वाद व्हायचे. याच रागातून आरोपींनी पूर्वनियोजित कट रचत, रोशन यास दारू पाजून पारडी जंगलात नेले आणि तेथे त्याचा खून केला.या कारवाईत पो.नि. आसाराम चोरमले, पो.नि. सिमा दाताळकर, एएसआय युसूफ सौदागर, पोहेकाँ छोटेलाल यादव, तसेच पोलिस अमलदार संजय भारसाकळे, नईम बेग, आशिष डवले, रंजित गावंडे, अमोल मनोहर, रामकृष्ण कांगडे, रुपेश काळे आणि चालक सुरज गाडे यांनी सहभाग घेतला.ही कारवाई पोलीस उपआयुक्त सागर पाटील (परिमंडळ १), गणेश शिंदे (परिमंडळ २), श्रीमती कल्पना बारवकर (मुख्यालय व गुन्हे शाखा प्रभारी), आणि सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# फळांच्या राजाचा घरोघरी थाट रसात तूप खाण्याचा घ्या आस्वाद

## जावईबापूंना खास आमंत्रण : बाजारपेठेत रसाळ आंब्याला वाढली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**



अनेक प्रांतांमध्ये आमरसात तूप मिसळून आवडीने खाल्ले जाते. उन्हाळा आला की शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना आंब्याचा रस खाण्याची इच्छा होते. विदर्भात विशेष करून धान उत्पादक जिल्ह्यात रसपोळी, रसासोबत शेवया खाल्लया जातात. मात्र काही कुटुंब आंब्याच्या रसामध्ये वरून तुपाची धार सोडतात. अर्थातच रसामध्ये तूप मिसळवून खातात. रसामध्ये तूप खाणे आरोग्यासाठी पोषक आहे, असे आरोग्यतज्ज्ञ सांगतात.

अमरावती शहरातील बाजारपेठेत सध्या हापूस आंब्यासह हायब्रीड वाणाचे रसाचे आंबे विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. सध्या आवक कमी असल्याने दर वाढलेलेच आहेत. मे आणि जून महिन्यांत रसाच्या आंब्याचे दर कमी होतात. कारण त्यावेळी आवक वाढते.

**असे आहेत बाजारपेठेत आंब्याचे दर**

| आंबा | दर |
|---|---|
| केसर | २७० |
| दशेरी | १८० |
| लंगडा | १५० |
| बेंगनपल्ली | १५० |

### आमरसात तूप मिसळून खाणे फायदेशीर

आमरसात तूप मिसळून खाणे काही प्रमाणात फायदेशीर मानले जाते; पण ते सर्वांसाठीच योग्य नाही. काही लोकांसाठी तूप पचनक्रियेत समस्या निर्माण करू शकते, तर काही लोकांसाठी ते फायदेशीर ठरू शकते. ज्या पचनशक्ती चांगली आहे, अशा व्यक्तींना आमरसामध्ये तूप मिसळवून खाल्ले तर पचनक्रियेत सुधारणा होते, असे आहारतज्ज्ञ सांगतात.

### पावडरच्या आंब्यांपासून लेकरांना दूर ठेवा

अलीकडे हायब्रीड वाणाचे आंबे पावडर व केमिकलचा वापर करून कृत्रिम पद्धतीने पिकविले जातात. कृत्रिम पद्धतीने पिकविलेले आंबे खाणे आरोग्यासाठी अपायकारक आहे. विशेष म्हणजे पावडरच्या आंब्यापासून लहान मुलांना दूर ठेवावे, त्यांना असे आंबे खायला देणे टाळावे, असे आरोग्य तज्ज्ञ सांगतात.

### अक्षय्य तृतीयेला नैवेद्यात आमरसाचे महत्त्व


अक्षय्य तृतीयेला नैवेद्य म्हणून आमरस अर्पण करणे हे विशेषतः महाराष्ट्रात आणि गुजरातमध्ये प्रचलित आहे. या दिवशी आंबा खाण्याची प्रथा आहे, कारण अक्षय्य तृतीयेला सुरू केलेले कार्य शुभ मानले जाते आणि आंबा या दिवसाची सुरुवात दर्शवतो. अक्षय्य तृतीयेला अनेकजण देवी-देवतांना विविध प्रकारचा प्रसाद अर्पण करतात.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची 'एचसीएल' कंपनी मध्ये निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची 'एचसीएल' या बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत निवड झाली. महाविद्यालयासाठी ही अभिमानाची बाब असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

या निवडीमध्ये संगणक अभियांत्रिकी शाखांमधील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांची निवड कठीण निवड प्रक्रियेतून झाली असून त्यामध्ये लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत व मानव संसाधन मुलाखतीचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी आपल्या तांत्रिक ज्ञानासोबतच संवाद कौशल्य आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्य व मेहनतीच्या जोरावर ही मोठी संधी प्राप्त केली आहे.



कंपनीची सर्व प्रक्रिया पार करत संगणक विभागातील मनस्वी देशमुख, निलेश देशमुख या विद्यार्थ्यांची या कंपनीने निवड केली आहे.

'एचसीएल' ही भारतातील आघाडीची माहिती तंत्रज्ञान सेवा कंपनी आहे. ही कंपनी आज जगभरातील ५० हून अधिक देशांमध्ये आपली सेवा पुरवते, जसे की क्लाउड कंप्युटिंग, सायबर सिक्युरिटी, डेटा नालिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात एचसीएल आपले नेतृत्व सिद्ध करत आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने व्यवसायांसाठी स्मार्ट सोल्युशन्स प्रदान करणे हा कंपनीचा मुख्य उद्देश आहे. कंपनीचे जगभरात कार्यालये असून भारत, अमेरिका, युरोप आणि आशियातील अनेक देशांमध्ये तिची सेवा आहे. भारतात विशेषतः नागपूर, मुंबई ,पुणे, चेन्नई, बंगलोर, हैदराबाद आणि गुरुग्राम येथे कंपनीची मोठी केंद्रे आहेत.

महाविद्यालयातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलने विद्यार्थ्यांना या संधीसाठी योग्य मार्गदर्शन केले तसेच त्यांची विविध कौशल्य चाचणी घेत तयारी करून घेतल्याने विद्यार्थ्यांना सहज यश प्राप्त करता आले.

पी .आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक डॉ पी.एम. खोडके, पी .आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावांधिया, उपप्राचार्य डॉ मो. झुहेर, डीन कॉर्पोरेट रिलेशन डॉ. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड , संगणक विभागाचे विभाग प्रमुख डॉ. विजय गडीचा तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि त्यांच्या मागण्या संदर्भात दिवसा तालुका काँग्रेस आक्रमक : खासदारांच्या व माजी मंत्र्यांच्या उपस्थितीत निवेदन तहसीलदारांना सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४तिवसा**



तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात दिवसा तालुका काँग्रेस कमिटी आक्रमक झाल्याचे चित्र तिवसा तहसील परिसरात दिसून आले.अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंतराव वानखडे व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या उपस्थितीत प्रचंड उन्हाचे तापमान असताना सुद्धा शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निदर्शने देऊन निषेध केला.या आंदोलनाच्या मागचा उद्देश असा की शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव द्यावा त्याचप्रमाणे निवडणुकीत आश्वासन देऊन सुद्धा महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी केली नाही, त्यामुळे सरकारने कुठलेही कारण न सांगता तातडीने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करावी, नियमित कर्ज भरणरे शेतकरी प्रोत्साहनपर अनुदानापासून वंचित असल्याचे दिसून येत असून त्याला अनेक महिन्यांचा कालावधी उलटला आहे त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रोत्साहन अनुदान तातडीने त्यांच्या खात्यात जमा करावे.वर्ष २०२४ व २०२५ सोयाबीन पिकाच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी सोयाबीन तूर कापूस चना या उत्पादनाला चांगला भाव नसल्याने भावांतर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदान द्यावे शेतकऱ्यांना त्वरित पीक विमा रक्कम द्यावी. कृषी पंपाकरिता रात्री ऐवजी दिवसाबीज पुरवठ्याची घोषणा निवडणुकीच्या वेळेस महायुतीच्या नेत्यांनी केली होती ती पूर्ण करावी तसेच दिवसा तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आंब्या बहाराची फळगड झाली असून उच्च तापमानामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्याचप्रमाणे तालुक्यातील अनेक पानंद रस्ते मंजुरा दिन असून पावसाळ्यापूर्वी ती कामे तातडीने पूर्ण करावी, तसेच खचलेल्या कॅनलची व पाटचऱ्यांची दुरुस्ती करून शेतकऱ्यांच्या समस्यांना न्याय द्यावा अन्यथा एक मे महाराष्ट्र दिनापासून दिवसा तालुका काँग्रेस व शहर काँग्रेस कमिटी आक्रमक आंदोलन करण्याचा इशारा यावेळी शासनाला तहसीलदार तिवसा यांचे मार्फत निवेदन देऊन करण्यात आला.यावेळी खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष, नगरसेवक वैभव स. वानखडे, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष दिलीप काळबांडे, शहराध्यक्ष सेतू उर्फ श्रीराम देशमुख,नगराध्यक्ष प्रतिभा गौरखेडे,उपाध्यक्ष प्रिया विघ्ने, सुनिता अळसपुरे शहर काँग्रेस कार्याध्यक्ष सुनील बाखडे, शहर महिला काँग्रेस अध्यक्ष रुपाली काळे, माजी सभापती कल्पना दिवे,माजी सभापती शिल्पा हांडे, बाजार समिती सभापती रवी राऊत, खरेदी-विक्री अध्यक्ष सुरेशराव मेटकर , प्रदेश सचिव रितेश पांडव, युवक अध्यक्ष लोकेश केने, स्वराज्य संस्था व सहकार क्षेत्रातील पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# 'शेतकरी सन्मान'च्या लाडक्या बहिणींना आता महिन्याचे पाचशेच रुपये मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

ज्या महिलांना पीएम किसान सन्मान व नमो शेतकरी योजनेंतर्गत वर्षाला १२ हजार रुपये मिळतात, त्यांना आता लाडकी बहीण योजनेत महिन्याला दीड हजार रुपयांऐवजी ५०० रुपये अर्थसाहाय्य दिले जाणार आहेत. याबाबत जिल्ह्यातील महिलांची पडताळणी सुरू




असून, ती अंतिम टप्प्यात आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना जुलै २०२४ पासून १ हजार ५०० रुपये दरमहा अर्थसाहाय्य दिले जात आहे. नवीन आर्थिक वर्षापासून यात वाढ करण्याचा निर्णयही शासनाने घेतलेला आहे; परंतु प्रत्यक्ष लाभ केव्हा मिळणार हे अजूही जाहीर केले नाही.दुहेरी लाभ घेणाऱ्या महिलांना प्रतिवर्ष १८ हजार रुपयांच्या मर्यादेत कोणत्याही एकाच योजनेचा लाभ मिळेल. त्यांना लाडक्या बहीण योजनेचे केवळ ५०० रुपये मिळणार आहेत.

**एप्रिलचा हप्ता केव्हा?**

नवीन आर्थिक वर्षातील एप्रिल महिन्याचा हप्ता केव्हा मिळणार, याबाबत महिलांमध्ये उत्सुकता आहे. हा हप्ता अक्षयतृतीया किंवा त्यापूर्वी मिळू शकतो, अशी सूत्रांची माहिती आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार लोकप्रतिनिधींविना


## नागरिक वैतागले : ग्रामीण भागातील कामे खोळंबली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका संपताच जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल, या अपेक्षेत अनेक इच्छुक मंडळी गुडघ्याला बाशिंग बांधून कामाला लागली होती. मात्र, सध्यातरी या निवडणुका आणखी पुढे ढकलल्या जाण्याचीच शक्यता असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार लोकप्रतिनिधींविनाच चालणार आहे. शिवाय यामुळे नागरिकांची हेळसांड होत असून, विकासकामांना खीळ बसली आहे.अमरावती महापालिका,जिल्हापरिषद, नगर परिषद पदाधिकाऱ्यांच्या कार्यकाळाला चार वर्षे उलटली आहेत.नगर परिषदेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपून दोन वर्ष झाली. अध्यक्ष असो वा नगरसेवकांच्या समोर 'माजी' हा शब्द लागला. मात्र, अजूनही यातील बऱ्याच पदाधिकाऱ्यांना पदावाचून करमेनासे झाले आहे. आजहीआजही बहुतेक जण नगरसेवक म्हणूनच वावरत आहेत. दीर्घकाळ लोटला, मात्र अद्यापही निवडणूक जाहीर झालेली नाही. तसेच मावळत्या पदाधिकाऱ्यांसह नवख्यांमध्ये निवडणुकीला घेऊन कुजबुज सुरू आहे. त्यामुळे इच्छुकांच्या नजरा निवडणुकीकडे खिळल्या आहेत. मात्र, निवडणूक झाली नसल्याने 'प्रशासकराज' सुरू आहे. त्यामुळे नगर परिषदांचा कारभारही वाऱ्यावर असल्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.



### प्रलंबित असलेली कामे मार्गी लावावी...



मंजूर झालेले अपूर्ण रस्ते, हातपंपांची दुरुस्ती, नाल्यांची बांधकामे, पाणीटंचाई निवारण, घरकुलांचे अनुदान, योजनेतील मंजूर विहिरी, पथदिव्यांची गैरसोय आदी कामे अद्यापही प्रलंबित असल्याची माहिती आहे. त्यामुळे ही कामे तत्काळ मार्गी लागण्याची गरज आहे.

**बबलू देशमुख**
**माजी जिल्हा परिषद अध्यक्ष**

**वस्तींमध्ये समस्या कायमच**

नगर पंचायतींतर्गत येणाऱ्या वस्तीत मोठ्या प्रमाणात समस्यांचे माहेरघर आहे. पाणीटंचाई, स्वच्छता, वीज आदींचा पुरता बोजवारा उडाला आहे. नागरिक मागण्यांचे निवेदन घेऊन जातात. मात्र, अधिकारी जागेवर सापडत नसल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. तसेच आपले गाऱ्हाणे मांडावे तरी कोणाकडे? असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित होतो आहे.

# फिरायला जाताय? एप्रिल, मे महिन्यात चोरटे सक्रिय

## बंद घरांवर चोरट्यांची नजर : मौल्यवान वस्तू बंद घरात ठेवू नका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये अनेक कुटुंब फिरायला जातात. अनेकजण गावी जातात किंवा आपल्याकडे नातेवाईक येतात. यादरम्यान, घर बंद असल्याचा गैरफायदा चोरटे घेत असतात.बंद दार असलेले घर पाहून आरोपी ते घर साफ करण्यासाठी टपून बसलेले असतात. तेव्हा उन्हाळ्यात फिरायला जाताना शेजाऱ्यांना



किंवा नजीकच्या पोलिस ठाण्यात याची माहिती दिल्यास ते हितावह ठरेल. उन्हाळ्यात अनेकजण सलग सुटी घेऊन गावी, नातेवाइकांकडे, देवदर्शन किंवा पर्यटनासाठी जातात. या काळात बंद घर हेरून चोरटे चोरी करण्यात यशस्वी ठरतात. चोरटे शक्यतो बंद घरांना टार्गेट करतात.यामुळे बंद असलेल्या घरांवर चोरट्यांची नजर असते. त्यामुळे शेजाऱ्यांची किंवा पोलिसांची आपल्या घरावर नजर असावी, यासाठी त्यांना माहिती देणे आवश्यक आहे.जिल्ह्यात उन्हाळ्यात रात्रीपर्यंत पोलिसांची गस्त असते. गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची करडी नजर राहते.जिल्हाभरातदेखील पोलिसांची गस्तवाढविण्यात येणार आहे. उन्हाळ्यात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस यंत्रणा २४ तास दक्ष राहून कार्य करीत आहे.

### कुलूप लावून जाण्यापूर्वी...

उन्हाळ्यात कष्टाने कमावलेले दागिने, पैसे चोरट्यांच्या हाती पडू नये, यासाठी नागरिकांनी दक्षता घेण्याची गरज आहे. बाहेरगावी जाताना शेजाऱ्यांना ३ घराकडे लक्ष ठेवण्यास सांगावे, दाराला कुलूप लावून तसेच खिडक्या व गॅलरीची दरवाजे बंद करून ठेवावेत. घराचा संपूर्ण भाग किंवा घरात ३ प्रवेश करण्यासाठी असलेली दारे, खिडक्या यांच्यावर सीसीटीव्हीचा वॉच राहील अशा दिशेने कॅमेरे बसवावेत. जे लोक सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा खर्च सहज उचलू शकतील त्यांनी तो खर्च उचलावा.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२५ जाहीर

## १ मे रोजी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते पुरस्कार वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२५ विद्यापीठस्तर व महाविद्यालयीन स्तरावरील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना जाहीर झाला आहे. दि. १ मे, २०२५ रोजी ध्वजारोहण कार्यक्रमानंतर लगेचच विद्यापीठातील दृकश्राव्य सभागृहात आयोजित पुरस्कार प्रदान समारंभामध्ये कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते हे पुरस्कार प्रदान केले जातील. शाल व श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र आणि १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक असे पुरस्काराचे स्वरुप आहे.




**विद्यापीठ स्तर**

सन २०२५ च्या विद्यापीठ स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारासाठी प्रथम श्रेणी अधिकारी सर्वसाधारण संवर्गात जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास रामदासपंत नांदुरकर, द्वितीय श्रेणी अधिकारी सर्वसाधारण वर्गवारीत अधीक्षक (सामान्य प्रशासन) श्री उमेश प्रभाकर लांडगे व महिला वर्गवारीत अधीक्षक (विकास) सौ. उमा प्रकाश चांभारे, तृतीय श्रेणी कर्मचारी सर्वसाधारण वर्गवारीत वरिष्ठ लघुलेखक (परीक्षा) श्री प्रविण रंगरावजी अलटकर व महिला वर्गवारीत वरीष्ठ सहाय्यक (वित्त) सौ. प्रज्ञा किशोर बोंडे, तर चतुर्थ श्रेणी कर्मचारी सर्वसाधारण वर्गवारीत प्रयोगशाळा परिचर (रासायनिक तंत्रशास्त्र) श्री गजानन निळकंठराव देशमुख यांना पुरस्कार घोषित झाला आहे.*महाविद्यालयीन स्तर*सन २०२५ च्या संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारासाठी सर्वसाधारण संवर्गात श्रीमती नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालय, यवतमाळचे प्राचार्य डॉ. जयंत मधुकर चतुर व महिला संवर्गात विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा एस. येनकर, शिक्षक सर्वसाधारण वर्गवारीत श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. दिपक केवळरामजी कोचे व महिला वर्गवारीत श्री आर.एल.टी., महाविद्यालय, अकोला येथील रसायनशास्त्र विभागाच्या प्राध्यापक डॉ. पुनम टिकमचंद अग्रवाल तसेच सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी सर्वसाधारण वर्गवारीतून बॅ. रामराव देशमुख कला, श्रीमती इंदिराजी कापडीया वाणिज्य व न्या. कृष्णराव देशमुख विज्ञान महाविद्यालय, बडनेरा येथील वरिष्ठ लिपीक श्री जयंत वसंतराव निखारे यांना पुरस्कार घोषित झाला आहे.

उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारप्राप्त सर्व प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.

# तालुका क्रीडा संकुलाची दुर्दशा पाहून आमदारांनी अधिकाऱ्यांना सुनावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अचलपूर**

अचलपूर-चांदूर बाजारचे आमदार प्रवीण तायडे यांनी मंगळवारी २२ एप्रिलला सकाळी तालुका क्रीडा संकुलला भेट दिली. दरम्यान येथील दुर्दशा पाहताच ते क्रीडा अधिकाऱ्यांवर भडकले. त्यांनी फोनवरच संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या.



या क्रीडा संकुलाच्या अव्यवस्थेबद्दल उपस्थित क्रीडाप्रेमींनी आमदारांपुढे समस्यांचा पाढाच मांडला होता. आमदार प्रवीण तायडे यांनी दिलेल्या या भेटीदरम्यान त्यांनी परिसरातील ट्रॅकची पाहणी केली. या ट्रॅकवर पाहिजे तसा प्रकाश नाही. क्रीडा संकुलातील स्वच्छतागृहात अस्वच्छता होती. परिसरही अस्वच्छ होता. त्यामुळे आमदारांनी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून धारेवर धरले. क्रीडा प्रेमींनी मांडलेल्या समस्यांबाबत अधिकाऱ्यांशी बोलून क्रीडा संकुलात मुलींसाठी चेंजिंग रूम, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था, क्रीडा संकुलमध्ये पथदिवे, गोळा फेकची सोय आदी सुविधा या क्रीडा संकुलमध्ये उपलब्ध करून द्याव्या, याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या. या वेळी आमदार तायडे यांनी क्रीडा संकुलमधील अर्धवट बांधकाम असलेल्या इमारतीचीही पाहणी केली.

नोकरीसाठी आज शारीरिक दृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक आहे. यामुळे युवकांचा कल मैदानी खेळाकडे जास्त आहे. शासनाने तालुकास्तरावर क्रीडा संकुलाची सोय केली आहे. यावर दरवर्षी लाखो रुपये खर्च होतात. मात्र तालुकास्तरावर पाहिजे तशा सुविधा क्रीडा विभागाने उभारल्या नाही, त्यामुळे तालुकास्तरावरील क्रीडा संकुलकडे क्रीडा विभागाचे दुर्लक्ष असल्याचे क्रीडा प्रेमींमधून मधून व्यक्त होत आहे. या वेळी आमदार प्रवीण तायडेंसोबत भाजपचे माजी तालुकाध्यक्ष मुरली माकोडे, ग्रामीण तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे, शहराध्यक्ष टिकू उर्फ आनंद अहिर, मनीष नागलिया, लखन चौधरी, प्रतीक भुसारी यांच्यासह इतर कार्यकर्ते व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

# अमरावतीत पहलगाम येथील हल्ल्याचा वकील संघाकडून निषेध

## दहशतवादांना कडक शासन करा... अमरावती जिल्हा वकील संघाची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

जम्मू कश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकावर केलेल्या बेछुट गोळीबाराचा अमरावती जिल्हा वकील संघाने तीव्र निषेध करत अमरावती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना निवेदन दिले.




अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनील देशमुख यांच्या नेतृत्वातजिल्हा न्यायालया पासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत वकील संघाने मूक मोर्चा काढला, यावेळी दहशतवादी हल्लूयात मृत पावलेल्या पर्यटकांना वकील संघाने श्रद्धांजली वाहत, दहशतवाद्यांना कडक शासन करण्याची मागणी यावेळी वकील संघाने केली, या हल्लूयाचा सर्व वकिलांनी तीव्र शब्दात निषेध केला,ॲड आशिष लांडे,ॲड.अमोल मुरल,ॲड.विद्या मानके काळे.ॲड. कृषिकेष उपाध्ये ,ॲड.सुमित शर्मा, ॲड. अक्षय बोले,ॲड.नेतात मल्ला ,ॲड. आशिषसिंग परिहार, ॲड. विशाखा तागडे पाटील ,ॲड पूनम रिठे ,ॲड प्रशांत देशपांडे यांच्या सह शेकडो वकील उपस्थित होते.

# सुरळीत वीज पुरवठ्यासाठी धामणगावात (रेल्वे) उपाय- योजनांना गती



## आमदार प्रताप अडसड यांच्या निर्देशानुसार नविन लिंक लाईन टाकून बॅक फिडींगची व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

सुरळीत वीज पुरवठ्यासाठी धामणगाव( रेल्वे) शहरात अतीभारीत वाहिन्याचे विभाजन करून त्या वाहिन्यांवरील भार कमी करणे, नादुरूस्त झालेल्या ३३ केव्ही आणि ११ केव्ही वीज वाहिन्या बदलविणे, फुटलेले इन्सुलेटर बदलविणे, तुटलेले जंपर जोडणे यासह देखाभाल दुरूस्तीच्या कामांना गती देण्यात आली आहे.याशिवाय आमदार प्रताप अडसड यांच्या निर्देशानुसार आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात आपात्कालिन परिस्थितीत शहराला बॅकफिडींगच्या माध्यमातून वीज पुरवठा सुरळीत रहावा यासाठी नविन लिंक लाईन टाकण्याचे कामही महावितरणकडून करण्यात येत आहे. वीज यंत्रणेशी संबंधीत ही कामे वीज पुरवठा बंद करूनच करावी लागतात. त्यामुळे या काळात वीज ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन कार्यकारी अभियंता अनिरूध्द आलेगावकर यांनी केले आहे.वीज वितरण व्यवस्थेतील वीज वाहिन्या, खांब, रोहित्र इत्यादी यंत्रणा उघड्यावरच असते. त्यामुळे त्यातील इन्सुलेटर, कंडक्टर इ. वर वादळ, वारा, पाऊस आणि तापमानाचा विपरीत परिणाम होत असतो आणि याचा परिणाम ग्राहक आणि ग्राहक सेवांवर होतो. त्यामुळे महावितरणने उन्हाळी हंगाम आणि त्यानंतर लवकरच सुरू होणारा पावसाळा लक्षात घेऊन कामाला सुरुवात केली आहे. यामध्ये शहरातील मुख्यत्वे सैल गार्डिंग आणि स्पॅन्स घट्ट करणे, दोन खांबांमध्ये लटकलेल्या तारा ओढणे, सर्व खांब सरळ करणे आणि त्यांचा ताण टाकणे इत्यादी कामे मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून शहरात विविध ठिकाणी चार एबी स्विच लावण्याचे काम प्रगती पथावर आहे. एबी स्विच कार्यान्वित झाल्यास वीज यंत्रणेत बिघाड झाल्यास दुरूस्तीसाठी फार कमी वेळ लागणार आहे.याचबरोबर ३३ केव्ही उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची तेलाची योग्य पातळी राखणे आणि सिलिका जेल खराब झाल्यास बदलणे, वीज वितरण व्यवस्थेत अर्थिंगला अधिक महत्त्व असून त्यासाठी रोहित्रांचे अर्थिंग, खांब, वितरण पेटी, फीडर पिलर, मिनी फिडर पिलर यांचे अर्थिंग मजबूत करण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे.धामणगाव रेल्वे शहराला आपात्कालिन परिस्थितीतही सुरळीत वीज पुरवठ्याची तजवीज करतांना ११ केव्ही मंगरूळ फिडर व टाऊन फिडर जोडण्यासाठी पांडे लेआउट येथे लिंक लाईनचे काम आठवडाभऱ्यात सुरू होणार आहे. तसेच एमआयडीसी फिडरमधून बॅक फिडिंगसाठी हाऊसिंग कॉलनी, श्रीराम शाळा, कॉटन मार्केट चौक, भगतसिंग चौक या भागांत योजना राबवण्यात येणार आहे असल्याची माहिती कार्यकारी अभियंता अनिरूध्द आलेगावकर यांनी दिली आहे.